| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ११७ वा | शुक्रवार, दिनांक २४ जुलै २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## आंदोलक विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जविरोधात याचिकाच नाही

### 'त्या' बातम्या खोट्या,उगख सूर्य कांत यांचा माध्यमांवर संताप!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** नीट पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत दिल्लीत निदर्शने करणाऱ्या विद्यार्थ्यांवर व आंदोलकांवर दिल्ली पोलिसांनी लाठीमार केला होता. या कारवाईविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती आणि या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी नकार दिला होता, असं वृत्तांकन अनेक प्रसारमाध्यमांमध्ये झालं होतं.

परंतू, लाइव्ह लॉने दिलेल्या वृत्तानुसार विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरील पोलिसांच्या कारवाईविरोधात दाखल केलेली याचिका सुनावणीसाठी सूचीबद्ध करण्यास सरन्यायाधीशांनी नकार दिल्याचा दावा करणाऱ्या वृत्तांचे भारताचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी खंडन केले आहे. सर्वोच्च न्यायालयात अशी कोणतीही याचिका दाखलच करण्यात आलेली नव्हती, असे स्पष्ट करत सरन्यायाधीशांनी याप्रकरणी माध्यमांच्या बेजबाबदार आणि धादांत खोट्या वृत्तांकनावर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे.

न्यायालयात या मुद्द्यावर स्पष्टीकरण देताना



सरन्यायाधीश म्हणाले की, त्यांच्यासमोर कोणतीही नियमित याचिका सादर करण्यात आली नव्हती; तर एका वकिलाने केवळ पत्रवजा निवेदन सादर केले होते. कोणतीही औपचारिक याचिका दाखल नसताना केवळ एका निवेदनाची 'याचिका' म्हणून सुनावणी कशी घेतली जाऊ शकते, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

**नेमके काय म्हणाले सरन्यायाधीश?**

माध्यमांच्या वृत्तांकनावर आक्रमक पवित्रा घेत सरन्यायाधीश म्हणाले, गेल्या दोन दिवसांत असे धादांत खोटे विधान पसरवले गेले की, एक प्रकरण न्यायालयात दाखल करण्यात आले होते. माध्यमांना जणू कोणतीही जबाबदारीच उरलेली नाही! 'सरन्यायाधीशांनी प्रकरण सूचीबद्ध करण्यास नकार दिला', असे खोटे वृत्त पसरवले जात आहे. आज सकाळी १० वाजेपर्यंत एक पानही दाखल करण्यात आलेले नव्हते. ते केवळ एक निवेदन होते... जे त्या मिश्रा किंवा अन्य कोणीतरी पाठवले होते. मी त्या निवेदनाला रिट याचिका कसे मानू शकतो? आणि याचे इतके बेजबाबदारपणे वृत्तांकण कसे होऊ शकते?

**नेमके प्रकरण काय?**

ज्येष्ठ वकील शोएब आलम हे अन्य एका प्रकरणाच्या सुनावणीसाठी न्यायालयासमोर आले असताना सरन्यायाधीशांनी हे भाष्य केले. याआधी २२ जुलै रोजी ॲड. नरेंद्र मिश्रा यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरील पोलिसांच्या कारवाईसंदर्भातील आपले पत्रवजा निवेदन सरन्यायाधीशांसमोर सुनावणीसाठी तोंडी स्वरूपात मांडले होते. तेव्हा हे प्रकरण ऐकण्यास नकार देत सरन्यायाधीशांनी, आमचा वेळ वाया घालवू नका आणि तुमचाही वेळ वाया घालवू नका, असे वकिलांना खडसावले होते. तसेच, पोलिसांच्या कारवाईचे व्हिडिओ आपल्याकडे असल्याचे वकिलाने सांगताच, आम्हाला व्हिडिओमध्ये रस नाही; ते पाहण्यासाठी आमच्याकडे वेळ नाही, अशी स्पष्ट भूमिका सरन्यायाधीशांनी घेतली होती.

या संपूर्ण घडामोडीनंतर माध्यमांमध्ये आलेल्या चुकीच्या वृत्तांवर सर्वोच्च न्यायालयाकडून अत्यंत कडक शब्दांत आक्षेप घेण्यात आला असून, कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करता अशा प्रकारे चुकीच्या बातम्या पसरवणे योग्य नसल्याचे सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले आहे.

## 'चरणसेवा'ने जपले लाखो वारकऱ्यांचे आरोग्य

### ४.९६ लाखांहून अधिक वारकऱ्यांना लाभ



**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या 'चरणसेवा' उपक्रमाचा समारोप शुक्रवार, दि. २४ जुलै रोजी होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामार्फत लोकसहभागातून हा उपक्रम राबविण्यात आला. यंदाच्या आषाढी वारीत राज्यातील १४ जिल्ह्यांतील ४ लाख ९६ हजारांहून अधिक वारकऱ्यांनी थेट चरणसेवा आणि आरोग्यसेवेचे लाभ घेतला. आषाढी वारीदरम्यान वारकऱ्यांना होणारा शारीरिक ताण, स्नायूदुखी, पायांना येणारे फोड, थकवा तसेच पावसाळ्यातील संसर्गजन्य आजारांचा धोका लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला. मागील वर्षी सात जिल्ह्यांमध्ये सुरू झालेल्या या उपक्रमाचा यंदा विस्तार करून तो दिंडी मार्गावरील १४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आला.

**या चौदा जिल्ह्यांत उपक्रम :**

सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, वाशिम, सांगली, अमरावती आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांतील १४० मुक्कामस्थळांवर सेवा केंद्रे उभारण्यात आली. या केंद्रांमधून वारकऱ्यांना चरणसेवा, मोफत आरोग्य तपासणी, फिजिओथेरपी, प्रथमोपचार, आवश्यक औषधांचे वितरण, रुग्णवाहिका सुविधा तसेच गरजेनुसार पुढील उपचारांची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली.

**३ हजार लिटर आयुर्वेदिक औषधी तेलाचा वापर :**

या उपक्रमात १६४ आरोग्य संस्थांनी सहभाग घेतला. ७ हजार ५३८ स्वयंसेवक तसेच ११ हजार ३३१ डॉक्टर, वैद्यकीय प्रशिक्षणार्थी विद्यार्थी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी सेवाकार्यात योगदान दिले. सेवेसाठी १० हजार टी-शर्ट आणि ३ हजार लिटर आयुर्वेदिक औषधी तेलाचा उपयोग चरणसेवेसाठी करण्यात आला. तसेच ८ रथांद्वारे जनजागृती करण्यात आली. लोकसहभागातून साकारण्यात आलेल्या या उपक्रमातून तब्बल ४ लाख ९६ हजारांहून अधिक वारकऱ्यांना प्रत्यक्ष चरणसेवा आणि आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात आली.

**दिंडीत अवयव दानावर जनजागृती :**

उपचारांबरोबरच आरोग्य जनजागृतीलाही विशेष महत्त्व देण्यात आले. आरोग्य जनजागृती रथांद्वारे स्वच्छता, सुरक्षित पिण्याचे पाणी, संसर्गजन्य आजारांपासून बचाव, रक्तदान, अवयवदान संदर्भात जनजागृती, निरोगी जीवनशैली तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती वारकऱ्यांपर्यंत आरोग्य रथाच्या माध्यमातून पोहोचविण्यात आली.

**प्रतिक्रिया :**

राज्यातील १४ जिल्ह्यांमध्ये ४ लाख ९६ हजारांपेक्षा अधिक वारकऱ्यांपर्यंत 'चरणसेवा' पोहोचविता आली, याचा आनंद आहे. या उपक्रमाच्या यशामागे लोकसहभाग हीच सर्वात मोठी ताकद ठरली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेला विविध आरोग्य संस्था, दानशूर व्यक्ती, डॉक्टर, वैद्यकीय प्रशिक्षणार्थी विद्यार्थी, आरोग्य कर्मचारी आणि हजारो स्वयंसेवकांनी दिलेल्या मोलाच्या सहकार्यामुळे हे सेवाकार्य यशस्वी झाले.

## श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेचे उद्घाटन

### लाल मातीतील कुस्तीला नवसंजीवनी देण्याचे कार्य डॉ.कराड यांनी केले: हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग यांचे विचार

**पंढरपूर/प्रतिनिधी :** लाल मातीतील कुस्तीला नवसंजीवनी देण्याचे कार्य डॉ. विश्वनाथ कराड यांनी केले आहे. त्यांनी शक्तिची पूजा केली आहे. येथे आलेल्या वारकरी पैलवानांमुळे या लाल मातीची शोभा वाढली आहे, त्यांच्यामुळे वाखरी फुलली आहे. असे विचार हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग यांनी व्यक्त केले.

विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत, श्री क्षेत्र आळंदी-देहू-परिसर विकास समिती, पुणे यांच्यातर्फे वाखरी, पंढरपूर येथे पालखी तळाच्या शेजारी, विश्वशांती गुरुकुल परिसरात वारकरी भाविक भक्तांसाठी आषाढी वारीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

विश्वशांती केंद्र (आळंदी),माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा.कराड यांच्या आशीर्वादाने व माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे व्यवस्थापकीय विश्वस्त आणि कार्यकारी



अध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांच्या मार्गदर्शनाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या वेळी महाराष्ट्र केसरी पै. आप्पासाहेब कदम, नजरुद्दीन नायकवडी आणि महाराष्ट्र केसरी पै. विष्णूतात्या जोशीलकर सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच, ह भ प तुळशीराम दा कराड, माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. मंगेश तु. कराड,डॉ. हनुमंत तुळशीराम कराड, राष्ट्रीय कुस्तीगीर महेश वरूटे, सुरजीत सिंग, श्रीकांत देशमुख, सामाजिक कार्यकर्ता सालगुडे पाटील, कदम पाटील, सरकार निंबाळकर, कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष राजाभाऊ जाधव, भीमराव आदलिंग, शिवाजीराव काळे, वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेच्या संयोजन समितीचे सचिव प्रा.विलास कथुरे उपस्थित होते.

हिंदकेसरी पै. दिनानाथ सिंग म्हणाले, हा सोहळा मन आणि चित्त प्रसन्न करतो. त्यामुळे येथे येणार्या प्रत्येक भक्ताला तीर्थक्षेत्रात आल्याची अनुभूती मिळते. डॉ. कराड यांनी वैष्णवांच्या मेळाव्यात कुस्तीचा आखाडा भरविला आहे. येथे भक्ती आणि शक्तीचा आदर्श उभा राहिलेला दिसत आहे.

डॉ. मंगेश कराड म्हणाले, वारकरी संप्रदाय परंपरा ७५० वर्ष जुनी आहे. या परंपरेचे पाईक विश्वधर्मी डॉ. विश्वनाथ कराड यांनी समाज घडविण्यासाठी विश्वशांती केंद्राची स्थापना केली. या माध्यमातून सर्व संतांची शिकवण पुढे चालू ठेवली आहे. यातून आत्मचिंतनाची दिशा दाखवली आहे. वारकरी संप्रदाय जगाला सुख, समाधान आणि शांतीचा मार्ग दाखवेल. आज येथे भक्ती आणि शक्तीचा संगम दिसून येत आहे. याच कार्याचा भाग म्हणजे ही कुस्ती स्पर्धा आहे.

श्रीकांत देशमुख म्हणाले, संस्कृती आणि परंपरा टिकवणारी ही प्रथा पुढे चालवत डॉ. विश्वनाथ कराड यांच्या मार्गदर्शनात कुस्तीचे आयोजन केले. वारकरी हा काटक आहे. डॉ. कराड यांच्या कार्यासमोर सर्व पुरस्कार नगण्य असून त्यांचे कार्य अतुलनीय आहे. प्रा.विलास कथुरे यांनी प्रास्ताविक व कुस्ती स्पर्धाचे नियोजन केले. बाबा निम्हण यांनी धावते समालोचन केले. डॉ. महेश थोरवे यांनी सूत्रसंचालन केले.

## बाल रुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच आर्थिक सहाय्य

**लातूर/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी अंतर्गत बालरुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच स्वतंत्र आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. महागड्या निदान चाचण्यांमुळे उपचार प्रक्रियेत होणारा विलंब टाळून कर्करोगाचे वेळेत निदान व्हावे, यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात त्रिपक्षीय करार करण्यात आला आहे. या विशेष उपक्रमांतर्गत राज्यातील २०० आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्करोगग्रस्त बालरुग्णांना निदानासाठी आवश्यक असलेल्या वैद्यकीय चाचण्यांसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.

या लाभाअंतर्गत ० ते १८ वयोगटातील पात्र बालरुग्णांना कर्करोगाचे निदान निश्चित करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्राथमिक तसेच पुढील खर्चिक वैद्यकीय चाचण्यांसाठी आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. या सहाय्यामुळे आर्थिक अडचणींमुळे निदान प्रक्रियेत होणारा विलंब टाळून वेळेत निदान आणि उपचाराचे प्रभावी नियोजन करणे शक्य होणार आहे. पहिल्या दोन महिन्यांतच ५९ बालरुग्णांना ५० लाख रूपयांचे आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात आले आहे. या सर्व बालरुग्णांचे कर्करोग निदान टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथे करण्यात आले. बालरुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच सुरू करण्यात आलेला हा उपक्रम आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी महत्त्वाचा आधार ठरत आहे. वेळेत निदान झाल्यामुळे उपचाराला होणारा विलंब कमी होऊन बालरुग्णांना योग्य वेळी उपचार सुरू करण्यास मदत होत आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी अंतर्गत बालरुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच स्वतंत्र आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. हा लाभ राज्यातील २०० आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्करोगग्रस्त बालरुग्णांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या २०० लाभार्थ्यांपैकी आतापर्यंत ५९ बालरुग्णांना निदानासाठी आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे. गरजू रूग्णांनी अधिक माहितीसाठी टोल फ्री क्रमांक १८००१२३२२११ वर संपर्क साधावा असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

## प्रभात किरणे

धनवानानी लाचार होऊ नये
विचारवंतांनी गुलाम होऊ नये
पुढ्यांनी नैतिकता सोडू नये
पत्रकार लेखकांनी तत्व सोडू नये
लोकशाहीचे मारेकरी होऊ नये

– इंजि. नागनाथ कलवले

लातूर ९७६४७ ८८२८८

## आषाढी एकादशी निमित्त मोहन महाराज यांच्याकडून फराळाचे वाटप व जन्मोत्सव २७ ऑगस्टला



**लातूर/प्रतिनिधी :** येथील संतोषी मातेचे भक्त मोहन महाराज खंडेलवाल यांनी मोठी एकादशी म्हणजे आषाढी एकादशी निमित्त संतोषीमातेच्या भक्तांना मोठ्या प्रमाणात फराळाचे वाटप करण्यात आले. शाबुदाना, शेंगदाणे, भगर आदि उपवासाच्या फराळाचे सामान एका पिशवित भरून घरोघरी वाटप करण्यात आले. मोहन महाराज खंडेलवाल यांच्या परिश्रमातून लातूरात पहिले संतोषी मातेच्या मंदिराची उभारणी लोकसहभागातून करण्यात आली आहे. लातूरच्या हत्तेनगर परिसरात संतोषी मातेचे मंदिर उभारण्यात आले असून भाविक भक्त दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात येत आहेत. मोहन महाराज यांनी अनेक सामाजिक कार्य केले असून गरजवंतास मदत केली आहे. पाणी टंचाई असो किंवा लॉकडावुनमधील नागरिकांच्या समस्या सोडविल्या आहेत. गरीब कुटुंबातील मुलीचा विवाह स्वखर्चातून लावला आहे.

**श्री संतोषीमाता जन्मोत्सव आता २७ ऑगस्ट रोजी होणार:मोहन महाराज**

तसेच लातूर येथील हत्ते नगरातील श्री संतोषी माता मंदिरात दि.३० ऑगस्ट रोजी श्री संतोषीमाता जन्मोत्सव करण्याचे ठरले होते परंतु काही अडचणीमुळे तो आता गुरवार,दि.२७ ऑगस्ट २०२६ रोजी होणार आहे,अशी संतोषीमाता भक्त मोहन महाराज यांनी कळविले आहे.

लातूरच्या हत्ते नगर रोड नंबर ४ वरील श्री संतोषी माता देवस्थानमध्ये गेली ३६ वर्षांपासून रक्षाबंधन अर्थात नारळी पौर्णिमेला श्री संतोषीमाता जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यात सकाळी १० वाजता श्री संतोषीमातेला अभिषेक, दुपारी १२.३० वाजता मातेची आरती आणि दुपारी १ ते ३ या वेळात प्रसादाचे वाटप करण्यात येते.

यंदाचा हा जन्मोत्स सोहळा गुरुवार, दि.२७ ऑगस्ट २०२६ रोजी होणार आहे, याची सर्व भाविक भक्तांनी नोंद घेवून सहकार्य करावे असे आवाहन श्री संतोषीमाता भक्त मोहन महाराज व संतोषीमाता जन्मोत्सव समिती,लातूरच्यावतीने करण्यात आले आहे.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**पेपरफुटी प्रकरण जलदगती न्यायालयात चालवणार- पंतप्रधान**

## चिमटा दयाचा



मोर्चा, आंदोलने म्हटले की मोठ्या प्रमाणात जनतेचा सहभाग होत होता!
आता बोलावुन मोर्चा व आंदोलने होतात !!
आंदोलानाची धार कमी होत आहे हेच आता दिसून येत आहे!!!

## भाजप कार्यकर्त्यांनी बूथस्तरावर संघटन अधिक मजबूत करावे : प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण

### आ. अभिमन्यू पवारांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन; नवनिर्वाचित खासदार–आमदारांचा भव्य नागरी सत्कार

**औसा/प्रतिनिधी :** भारतीय जनता पक्षाची ताकद ही तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये असून, प्रत्येक लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्याने बूथस्तरावर संघटन अधिक सक्षम करण्यासाठी काम केले पाहिजे. 'मन की बात' सारख्या उपक्रमांच्या माध्यमातून समाजाशी सातत्याने संवाद साधत विकासाच्या प्रवाहात प्रत्येक घटकाला सहभागी करून घेणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले.भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व पालकमंत्री शिवेंद्रसिहराजे भोसले यांच्या शुभहस्ते आमदार अभिमन्यू पवार यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन बुधवारी औसा येथे उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री भगवंत खुबा होते, तर भाजपचे प्रदेश सरचिटणीस सुनील राणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.यानंतर विजय मंगल कार्यालय, औसा येथे नवनिर्वाचित राज्यसभा सदस्य खासदार रामराव वडकुते, विधानपरिषदेचे नवनिर्वाचित सदस्य आमदार बसवराज पाटील आणि आमदार राजेंद्र राऊत यांचा भव्य नागरी




सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

ते पुढे बोलत होते औसा मतदारसंघातील विकासाचा अनुशेष भरून काढणे हे सोपे नव्हते. मात्र, विविध विभागांच्या माध्यमातून हजारो कोटी रुपयांचा निधी आणून रस्ते, पायाभूत सुविधा आणि विकासकामांना गती देण्यात आमदार अभिमन्यू पवार यशस्वी ठरल्याचे त्यांनी सांगितले. पूर्वी रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी निवेदने द्यावी लागत होती, मात्र आज ग्रामीण भागात दर्जेदार कॉंक्रीट रस्त्यांचे जाळे उभे राहिले आहे, भाजपच्या लोकप्रतिनिधींसह कार्यकर्त्यांनी संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याची गरज असल्याचे सांगत त्यांनी बूथस्तरावर संघटन बळकट करण्याचे आवाहन केले. 'मन की बात' सारख्या उपक्रमांमुळे समाजाशी सातत्याने संवाद साधण्यास मदत होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

देशाच्या सुरक्षेसाठी केंद्र सरकार नक्षलवादाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी प्रभावी पावले उचलत असल्याचे सांगताना त्यांनी शहरी नक्षलवादाबाबतही सावध राहण्याची आवश्यकता व्यक्त केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.ऊर्जा क्षेत्रातील बदलांचा उल्लेख करताना त्यांनी 'वन नेशन, वन ग्रिड' संकल्पनेमुळे अपरंपरागत ऊर्जेला चालना मिळाली असून राज्य लोडशेडिंगमुक्त करण्यासाठी सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याचे सांगितले. शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना वीजपुरवठा, वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर वीज थकबाकी माफीसारखे निर्णय सरकारने घेतल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमास राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, माजी आमदार त्र्यंबक भिसे, माजी आमदार दिनकरराव माने, माजी आमदार गोविंद अण्णा केंद्रे, बब्रुवान खंदाडे, भाजप लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, शशिकांत वडकुते, किरण उटगे, भिमाशंकर राचट्टे, देवीदास काळे,सुनील उटगे राहुल केंद्रे, प्रेरणा होनराव, नितीन काळे, सुभाष जाधव, संतोष मुक्ता, शोभाताई पवार, परीक्षित पवार यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## किल्लारीत निळकंठेश्वर साखर कारखान्याच्या मिल रोलर पूजनाचा सोहळा

किल्लारी येथील निळकंठेश्वर साखर कारखान्याच्या गळीत हंगामाच्या प्रारंभानिमित्त मिल रोलर पूजनाचा कार्यक्रम भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार बसवराज पाटील, आमदार राजेंद्र राऊत, भाजपचे प्रदेश सरचिटणीस सुनील राणे, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, माजी आमदार दिनकरराव माने, समृत जाधव, मानद सचिव प्रवीण फडणीस, संतोष बेंबडे, दत्तात्रय पतंगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.मान्यवरांनी मिल रोलरचे पूजन करून कारखान्याच्या यशस्वी गळीत हंगामासाठी शुभेच्छा दिल्या तसेच शेतकरी, सभासद आणि कारखान्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## आंदोलनाची धार हाताने कमी करू नये

आंदोलने, मोर्चे किंवा उपोषण जे लोकशाहीत लोकजागृतीचे प्रभावी माध्यम आहे ते बोथट होता कामा नये. त्याची धार आपल्या हाताने कमी होवू नये. हे लोकशाहीत जनजागृतीचे प्रभावी माध्यम आहे. अशा स्थितीत याला बोथट करण्याचा काहीचा प्रयत्न चुकीचा आहे. आंदोलन-उपोषण म्हटले की, पहिल्यांदा महात्मा गांधीजींची आठवण होते. महात्मा गांधीजी उपोषण करणार म्हटले की, ब्रिटीश सरकार घाबरत होते. महात्मा गांधी यांच्या उपोषणाच्यावेळी कोणाला बोलविण्याची किंवा निमंत्रण देण्याची गरज नव्हती. जनता स्वत: होवून सहभागी होत होती. आलिकडे काय होते तर आंदोलन करण्यासाठी बोलावले जाते. त्यांची सर्व सोय करावी लागते. त्यांना सांभाळावे लागते. पुर्वी नव्हते. एवढेच काय पुर्वी निवडणुकीत उमेदवार उभा राहीला तर कार्यकर्ते घरातील भाकरी घेवुन प्रचार करीत, आता परिस्थिती बदलली आहे. सर्व खर्च उमेदवारांना करावा लागतो. तसेच आता मोर्चा, आंदोलन मोर्चा म्हटले की, पहिल्यांदा कार्यकर्त्याची सोय करावी लागते. हा फरक लक्षात घेतला तर आलिकडील होणारे आंदोलनाबाबत आंदाज आला असेल. देशात विविध ठिकाणी आंदोलने होतात. त्याकडे पाहिले तर आंदोलनाची दिशाच बदलली आहे. दिल्लीत आंदोलन करणारे कोण आहेत? ते महात्मा गांधी किंवा अण्णा हजारे नाहीत. वांगचुक किंवा दिपके आहेत हे कोण आहेत. देशासाठी जेलमध्ये गेले आहेत का? आंदालनाकर्त्याच्या हाती भगतसिंह यांचा फोटो दिसला. वास्तविक शहीद भगतसिंह यांचा फोटो हाती घेवुन आंदोलन करण्याची लायकी दिसून येत नाही. पुर्वीचे नेते मंडळी जी राजगुरू, सुखदेच, भगतसिंह, चाफेकर बंधु असे किती तरी आंदोलनकरी यांचे नाव घेता येतील. त्यांची प्रमाणीक सेवा करण्याची ईच्छा होती. मुळात आपल्या देशात आंदोलन, मोर्च किंवा उपोषण करणारी मंडळी प्रमाणिक असतील तर हजारोंच काय लाखोंच्या संख्येने पाठींबा मिळाला असता. भोडोत्री आंदोलनकरी असतील तर आंदोलने यशस्वी होत नाहीत. त्यात चुकीच्या पद्धतीने आंदोलनकरी बोलावली असतील. त्यापेक्षा आंदोलनात काय दिसून आले. बाहेरच्या मंडळीच्या हाती काठ्या दिसून आल्या. उपोषणास बसणारी मंडळी जर सतरा दिवस ताजे दिसत असतील. साखर लेवल योग्य असेल तर निश्चित चोरून काही तरी प्रशान केल्याचा संयश निर्माण होणे स्वाभाविक आहे. फिजा असो किंवा फळाचा ज्युस पिवुन जर उपोषण करीत असतील तर ते योग्य नाही. पुर्वी पेक्षा आता लबाडी करताना दिसते. छुपे कॅमेरे असतात. त्यामुळे वेळीच चोरी पकडली जाते. आलिकडे आंदोलनकर्ते हे बाहेरच्या देशाकडून पैसा घेवुन ज्याला फंडींग म्हणतात तो वापरून सरकार पाडण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे बोलले जात आहे. वास्तविक आताच नाही तर बऱ्याच वर्षापासून बाहेरच्या देशातून फंडींग येतो आहे. लाखो-कराडोंच्या संख्येने पैसा भारतात येत आहे. ट्रस्टच्या नावाखाली येणार पैसा सामाजिक कार्यात खर्च न करता तो देशविरोधी कामे, धर्मांतर आदि कामात वावरला जात आहे ही बाब लपून राहीली नाही. देशात विदेशातून पैसा भारतात येत आहे तो देशविरोधी कामात वापरला जात आहे ही बाब लपून नाही तर उघडी पडली आहे. हा एक देशविरोधी कार्यक्रम चालू आहे. तो कार्यक्रम ठराविकाकडून विकत घेवून केला जात आहे. वास्तविक दिपके यांचा पेपरफुटी प्रकरणी संबंध आहे का? किंवा वांगचुक यांचा जरी काय संबंध आहे. मुळात अशांतात माजविण्यासाठी काही जणाकडून उचलेले पावुल आहे हे लक्षात घेतले पाहिजे. दिल्लीत आंदोलनात साडलेले आहेत त्यांच्या कारवाई होणार. त्यांचे आयुष्याचे काय होईल हे सांगता येत नाही. चुकीच्या पद्धतीने चालविलेले आंदोलने दिर्घ काळ टिकत नाहीत. चीन या देशाकडून जर फंडींग घेवून जर जसे बांगला देशात व नेपाळमध्ये विद्यार्थ्याकडून आंदोलने झाली. सरकार कोसळली. त्याच पद्धतीने भारतात आंदोलन करण्याचा विचार असेल तरे भारतातील जनता खपवुन घेणार नाही. आता पर्यंत पंतप्रधानांनी कोणती चुक केली का याचा विचार जनता करणार का नाही? भारतातील जनता विचारी आहे. बांगला देशी किंवा नेपाळ सारखी नाही. कोणाच्यातरी बेहकाव्यात येवुन देशात अस्थिरता माजवेल! अचानक परदेशातून कोणी तरी येवुन किंवा परदेशातच्या पैशातून निर्माण झालेला नेता जर आंदोलनाची धुरा आपल्या हाती घेवुन देशात अराजकता माजवित असेल तर ते योग्य ठरणारे नाही. भारत हा संत, महात्म्यांचा देश आहे. अमर शहिद बलिदानींचा देश आहे. लोकमान्य, सरदार पटेल, सुभाषचंद बोस तसेच वीर सावरकरांचा देश आहे. देशात भाडोत्री मंडळी येवुन देश अस्थिर करीत असेल तर भारतातील जनता खपवुन घेणार नाही. दिल्लीत अचानक आंदोलन तिव्र होते कसे किंवा या आंदोलनात विद्यार्थ्यापेक्षा इतरजन दिसत असतील तर देशातील जनता विचार करेल. मुळात चुकीच्या पद्धतीने चालणारे आंदोलने उघडी पडतात. लोकशाहीने दिलेल्या अधिकाराचा जर चुकीच्या पद्धतीने वापर होत असेल तर तो दिर्घ काळ टिकणार नाही. अमेरिकेतून थेट आंदोलनासाठी सहभाग घेणारा व्यक्ती देशाभिमान होवु शकत नाही. परदेशात जन्मलेली व्यक्ती भारताविषयी प्रेम करणारी असू शकत नाही. त्यामुळे देशात जे काही चालले आहे याचा विचार देशातील नागरिकांनी करण्याची गरज आहे. पश्चिम बंगालमध्ये काय घडत होते. केरळमध्ये काय घडले आहे याचा विचार केला पाहिजे. अनेक घुसखोरांनी भारतीय नागरिकत्व मिळाले आहे. आगामी काळात भारताला मोठा धोका होण्याची शक्यता आहे. भारतीयांना सावध आता पासून झाले पाहिजे. जे चुकीचे घडत आहे याला रोखले पाहिजे. उघडे पाडले पाहिजे. देशकर्ते कांही चुकत असतील तर त्यांनाही सोडले जावू नये. भाडोत्री व्यक्तींचा सहभाग आंदोलनात होत असेल तर लोकशाहीसाठी घातक आहे. लोकशाहीचा चुकीचा अर्थ घेतला जावू नये किंवा त्याचा उपयोग चुकीच्यापद्धतीने होत आहे हे पहिल्यांदा लक्षात घेतले पाहिजे. आंदोलनकर्ते काही ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून बऱ्याच देशविरोधी बाबी उघड होणार होत्या. आंदोलनाचा मार्ग चुकीचा ठरवू नये कारण लोकशाहीतील उपोषण, आंदोलन मोठे शस्त्र समजले जाते त्याला चुकीचा वापर करून बोथड ठरवु नका.

# श्री विठ्ठल : वारी आणि वारकरी



महाराष्ट्र ही अनेक धर्म, पंथ, संप्रदाय, विचारप्रवाह यांचा सुंदर मिलाफ घडवून आणणारी समन्वयभूमी आहे. वीरत्व आणि वैराग्याच्या परंपरा येथे गुण्यागोविंदाने एकत्र नांदल्या. नाथ, दत्त, वारकरी, महानुभाव, गणेश, सुफी, कबीर, समर्थ, आणि वीरशैव असे अनेक धर्मसंप्रदाय मराठी भूमीत रुजले आणि विकसितही झाले. संत-महंतांच्या शुद्ध विवेकनिष्ठेतून सांप्रदायिक समन्वयाचे वातावरण सतत नांदत राहिले, मध्ययुगीन ज्ञान-भक्तिप्रधान सर्व विचारप्रवाहांनी आध्यात्मिक लोकशाही प्रस्थापित केली. त्यात वारकरी धर्मसंप्रदायाचा वाटा भरीव असा आहे.

वारकरी संप्रदायाचे आचारधर्म :

वारकरी संप्रदायाचे आचारधर्म, समत्वदृष्टी, विश्वबंधुत्व, प्रीती या तत्त्वातून निर्माण झाले आहे. या आचारधर्मांना नीतिशास्त्राचे तात्त्विक अधिष्ठान आहे, म्हणून वारकऱ्याच्या आचारांना कर्मकांडाचे स्वरुप कधी प्राप्त झाले नाही. श्री विठ्ठल हाच समत्व धारण करणारा हरिहरैक्याचे प्रतीक असल्याने वारकऱ्यांच्या आचरणात समन्वयशीलता दिसून येते. या संप्रदायाचा ध्वज भगवी पताका असून, भजनकीर्तन करताना टाळ, मृदंग, वीणा यांचा वापर केला जातो. गळ्यात तुळशीमाळ व कपाळावर गोपीचंदनाचा टोळा ही वारकरी संप्रदायाची प्रतीके आहेत.

वारकऱ्यांचे दैवत श्री विठ्ठल :

'पांडुरंग', 'पंढरीनाथ', 'विठोबा', 'विठ्ठल', 'गोविंद', 'हरी', 'बाप रखुमादेविवरू' अशा अनेक नावांनी माणसाचे मन व्यापून टाकणारी श्री. विठ्ठल ही आराध्यदेवता आहे. ज्ञानोबांपासून निळोबांपर्यंतच्या सर्व श्रेष्ठ संतांनी त्यांच्या चरणचिंतनात जीवनाची कृतार्थता अनुभवली आहे. त्यांची वाणी त्यांच्या गुणगायनाने रंगलेली आहे. त्यांनी त्याला 'विष्णुसहित शिव' मानले आहे, 'बौद्ध' या बिरुदाने वाहिले आहे; त्याला 'जिनपुत्र बुद्ध' म्हटले आहे. विष्णूच्या नवव्या अवताराच्या ठायी त्याची स्थापना केली आहे; त्याला 'दिगंबर' म्हटले आहे : 'कानडा कर्नाटकु' म्हणून संबोधले आहे. याचाच अर्थ असा की, संतांनी आपल्या उदार आणि उन्नत दृष्टीतून शैव, वैष्णव, बौद्ध, जैन इत्यादी संघर्षशील धर्मधारांचा विठ्ठलाच्या ठायी सुमधुर संगम साधला आहे. अनेक संप्रदाय महाराष्ट्रात उदय पावले, नांदले आणि क्षीणही झाले; परंतु विठ्ठलभक्तीची धारा मात्र अजूनही उभ्या महाराष्ट्राची भावभूमी भिजवत वाहत राहिली आहे. म्हणूनच मराठी, कानडी, तामीळ इत्यादी संस्कृतीचा संगम असलेला हा 'विठ्ठल एक महासमन्वय' आहे. विठ्ठल ही सर्व विश्वाची व देवतांची मूलभूत देवता होय. सर्वांचे मूळ प्रेम आहे व त्याचे सगुणरुप श्री विठ्ठल होय.

**रामकृष्णहरी :**

'रामकृष्णहरी' हा वारकऱ्यांचा षडाक्षरी मंत्र आहे. या मंत्राविषयी प्रत्येक वारकऱ्यात अतीव श्रद्धाभाव आहे. वारकऱ्यांना रामकृष्णहरी या मंत्रात राम आणि कृष्ण ही विष्णूची दोन रुपे अभिप्रेत आहेत. या मंत्राचे स्वरुप बीज मंत्राप्रमाणे नसून ती एक प्रेमळ हाक आहे. रामकृष्णहरी मंत्राप्रमाणेच विठ्ठलाच्या नामस्मरणाला महत्त्व आहे. विठ्ठल, विठोबा रखुमाई यांचे भजन 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' चालीलाही वारकरी संप्रदायात महत्त्व आहे.

**तुळशीमाळ :**

'तुळशीमाळ' विठ्ठलास प्रिय म्हणून सर्व वारकरी गळ्यात धारण करतात. या पद्धतीवरुनच या संप्रदायास माळकरी असे म्हटले जाते. ही माळ घातल्यानंतर सत्य बोलणे, परस्त्री रुक्मिणीमातेसमान मानणे, हिंसा न करणे, आषाढी व कार्तिकी एकादशीस पंढरीची वारी करणे, एकादशी व्रत स्वीकारणे, रोज १०८ वेळा रामकृष्णहरी 'मंत्र' जपणे. मांसाहार त्याज्य, सदाचारी जीवन, प्रत्येक महिन्यातील शुद्ध व वद्य एकादशीस उपवास करणे, सदैव सत्य बोलणे, हरिपाठ व ज्ञानेश्वरी नित्यनेमाने पठण करणे, १०८ मण्यांची तुळशीमाळ गळ्यात घालणे इत्यादी नियमांचे पालन करावे लागते.

**मुद्राचारण :**

मुद्राधारण, हाही वारकऱ्यांचा एक आचारविशेष. गोपीचंदनाच्या गंधाची मुद्राधारण करणे किंवा कपाळाला बुक्का लावणे ही संप्रदायाची विशिष्ट खूण समजली जाते. हाती भगवी पताका घेऊन टाळ-मृदंगाच्या आवाजात पंढरीच्या वारीला जाणारा 'भागवत' परमार्थाच्या क्षेत्रात स्वतःला 'वीर' म्हणवून घेतो. गोपी श्रीकृष्णाच्या भक्तीत रमणाऱ्या होत्या. त्यांची स्मृती गोपीचंदनात असल्याने त्याचा गंध व मुद्रा धारणा गोपीप्रमाणे आपल्यातही बाणावी, अशी भावना यामागे असते.

**वारी :**

'वारी' ही वारकऱ्यांच्या जीवननिष्ठेचा एक भाग आहे. आषाढी, कार्तिकी पंढरीची वारी करणारा तो वारकरी असे संबोधले जाते. आषाढी शुद्ध एकादशीची वारी पंढरीची वारी ती देवाची आणि कार्तिक एकादशी ही आळंदीची वारी संताची. सर्व भेदभाव विसरुन विठ्ठल व वारकऱ्यांना भक्त 'उराउरी' भेटतात. या दोन्ही वाऱ्या वारकऱ्यांच्या प्राणभूत होत.

आषाढी, कार्तिकीबरोबर माघी आणि चैत्रीच्या वाऱ्यादेखील महत्त्वाच्या मानल्या जातात. टाळ, वीणा, मृदंग या वाद्यांनी सज्ज झालेली वारकरी दिंडी निघूनी, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम असा जयघोष करीत संतांचे अभंग गातात. प्रारंभीच्या काळात दिंड्यांनी पंढरपूरला वारीसाठी यायचे, हा प्रघात होता. त्याला पालखीची जोड दिली, ती सतराव्या शतकाच्या अखेरीस तुकोबांचे चिरंजीव नारायण बावा यांनी पुढे एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला ग्वाल्हेरचे शिंदे यांचे सरदार हैबतराय आरफळकर यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आळंदीहून स्वतंत्रपणे पंढरीस नेण्याची प्रथा सुरु केली. त्यानंतर अशा अनेक संतांच्या गावाहून त्या-त्या संताच्या पालख्या निघू लागल्या, आज पालखीसोहळा ही मराठी संस्कृतीची जणू ओळखच बनली आहे.

**भजन :**

वारकरी संप्रदायाच्या सामूहिकतेचे व एकतेचे मर्म भजनात दडलेले आहे. इथे प्रत्येकाच्या कृतीला समावसर आहे, वारकरी संप्रदायात भजन हे महत्त्वाचे प्रमाण आहे. तुकोबा म्हणतात...

तुका म्हणे एथ भजन प्रमाण । काय थोरपण जाळावे ते ।।
(तु.गा. अ.क्र. २७९८)

यामुळेच 'भजन करा सावकाश' असे संत बहिणाबाई म्हणतात.

वीणा, टाळ-मृदंगाच्या घोषात ब्रह्मरस सेवन करणे म्हणजे भजन होय.

लावुनि मृदंग श्रुति टाळ घोष । सेवू ब्रह्मरस आवडीने ।। (तुकाराम)

सुरुवातीस 'रामकृष्णहरी' भजन म्हणावयाचे. रमविणारा राम, आकर्षित करणारा कृष्ण व सर्व वृत्तीहरण करुन त्यांना प्रेमात (रमविणारा) हरी, भजन करता-करता वृत्ती तल्लीन होऊन जिवास गोड वाटते. ती गोडीच विटेवर उभी आहे. म्हणून तर

सुंदर ते ध्यान उभे विटेवरी । कर कटावरी ठेवूनिया ।।
(तु.गा. अ.क्र. ०२)
हा किंवा
रुप पाहता लोचनी । मुख झाले यो साजणी।।
(ज्ञानेश्वर)

हा अभंग म्हणावयाचा. नंतर हे ध्यान हृदयात ठेवण्यास्तव रुपाचे काही अभंग म्हणावयाचे.

तुझे रुपी डोळे ।
निवती सकळ सोहळ ।।

वगैरे अभंग म्हटल्यावर विठोबा-रखुमाई भजन करावयाचे. यानंतर आवडीनुसार नामपर, एकविश्व करुणापर, मागणीपर अभंग म्हणावयाचे, प्रसंगानुसार नाट, वासुदेव, खेळीचे इत्यादी अभंग म्हणावेत. नंतर ज्ञानेश्वर महाराजांच्या स्तुतिपर अभंग म्हणून ज्ञानेश्वरमाऊलीचे भजन करावे. शेवटी संताचा अभंग म्हणून पांडुरंगाची, ज्ञानेश्वरांची व तुकोबांची आरती म्हणावी. नामपर अभंगाने नामप्रेम वाढते, एकविश्व अभंगानी एकनिष्ठा तयार होते. करूणापर अभंगाने चित्तास कारुण्याचा पाझर फुटतो, खेळीया गाण्याने जीवनात खेळकरपणा नांदून परमात्म्याचे आपण खेळगडी आहोत, ही भावना दृढ होते. अशाप्रमाणे भजनाची स्थूल रुपरेषा आहे.

**नामस्मरण :**

भजन म्हणजे नामस्मरण, फक्त भजन हे नामस्मरणाचे विस्तारित रुप होय. नामस्मरण ही क्रिया व्यक्तिगत व सामूहिक दोन्ही पातळ्यांवर होणारी क्रिया आहे. भजनाच्या पातळीवर होणारे नामस्मरण ही सामूहिक कृती होय. ज्ञानदेवांच्या हरिपाठात नामस्मरणाचे महत्त्व भरले आहे.

योग याग विधी येणें नव्हे सिध्दि । वायाचि उपाधि दंभ धर्म ।।

असे ज्ञानदेव म्हणतात. इतर धर्म संप्रदायातले आचार हे ब्रह्मोपाधीसारखे असतात.

नामस्मरण हे अंतःकरणात भगवत्प्रेम जागवते.

संध्या कर्म ध्यान जप तप अनुष्ठान । अवघे घडे नाम उच्चारिता ।।
(तु.गा. अ.क्र. १७२७)

असे तुकोबा म्हणतात. वारकरी संप्रदायात नामस्मरण हे परमात्म प्रेमाच्या उदयाचे व विकासाचे एकमेव साधन मानले गेले आहे. नामस्मरणाचा सर्वश्रेष्ठ लाभ म्हणजे भगवत प्रेमाचा सहवास प्राप्त होतो, नामस्मरणाचा आविष्कार, भजन, कीर्तन, दर्शन, वारी, सत्संगात होतो.

**कीर्तन :**

महाराष्ट्रातील पारंपरिक, सांस्कृतिक संस्थांमध्ये कीर्तनसंस्थेला असाधारण महत्त्व आहे. यात गायन, वादन, वक्तृत्त्व, अभिनय, विनोद, गांभीर्य आणि श्रोता प्रेक्षकांच्या संबंधीची हृदयस्पर्शी आपुलकी या सर्व विशेषांचा अप्रतिम संयोग आढळतो. महाराष्ट्रातील कीर्तनकारांनी भारतीय व विशेषतः हिंदू संस्कृतीचे रक्षण केले. धर्मोपदेशाचे आणि सत्प्रचाराचे प्रभावी माध्यम म्हणून महाराष्ट्रातील संतमहंतांनी या संस्थेचा अत्यंत यशस्वीपणे वापर केला. केवळ धर्मोपदेशाचे साधन म्हणून नव्हे तर राष्ट्रीय भावनेच्या जागृतीसाठीदेखील कीर्तनाचा उपयोग भारतातील कीर्तनकारांनी केला.

नवविधा भक्तीत विशुद्ध भक्तीचे साधन प्राचीन काळापासून कीर्तनाचे महत्त्व म्हणून प्रतिपादिले आहे. प्राचीन काळी 'नामसंकीर्तन', 'गुणसंकीर्तन', 'लीळासंकीर्तन' असे स्वरुपावरुन प्रकार पाडले जात. कीर्तनाच्या सादरीकरणानुसार नारदीय, वारकरी, रामदासी, असे प्रकारही पडतात. कीर्तन वारकरी संप्रदायातला संस्थारुप पावलेला राहिलेला असा आचारधर्म आहे. वारकरी संप्रदायाने उभारलेले हे महत्त्वाचे व्यासपीठही आहे. 'नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।।' या संत नामदेवरायांच्या उक्तीतून कीर्तनाचे कार्य स्पष्ट होते. भजनाप्रमाणे कीर्तन हेही नामस्मरणाचे विस्तारित रुप आहे. परिणामी कीर्तनालाही सामूहिकतेचे परिणाम लाभलेले आहे. अर्थात व्यक्तिगत पातळीवरही भजन व कीर्तन या आचारधर्माचे पालन करता येते. म्हणूनच तुकोबांनी म्हटलेले आहे की,

चित्ताचे आसन ।
तुका करितो कीर्तन ।।
(तु.गा. अ.क्र. १२९१)

कीर्तनाच्या व्यासपीठावरुन वारकरी संतांनी आपल्या संप्रदायाची वैशिष्ट्ये स्पष्ट केली. भक्ती, नामस्मरण आणि नामाचा गजर ही वारकरी संप्रदायाची वैशिष्ट्ये होत. यामुळे कीर्तनात घटपटादी चर्चा, उपदेश कथन वगैरे गोष्टींपेक्षा भजनाला नामाच्या गजराला अधिक महत्त्व असते. वारकरी संप्रदायाचे कीर्तन इतर कीर्तन पद्धतीपेक्षा वेगळे आहे. पंडिताच्या प्रवचनाशी किंवा हरदासाच्या दरबारी कीर्तनाशी याचा संबंध नाही.

वारकरी कीर्तन पद्धती :

वारकरी कीर्तनात कीर्तनकार स्वतःमध्ये उभा राहून भोवती एक विणेकरी व काही टाळकरी उभे असतात. प्रारंभी 'जय जय रामकृष्ण हरी' हे भजन होते. नंतर 'सुंदर ते ध्यान..' हा तुकोबांचा अगर 'रुप पाहता लोचनी' हा ज्ञानोबांचा अभंग म्हणतात. नंतर पुन्हा 'जय जय रामकृष्ण हरी' हे भजन होते. यानंतर कीर्तनासाठी घेतलेला अभंग म्हटला जातो. कीर्तनासाठी ज्ञानदेव महाराजांपासून ते निळोबाराय यांच्यापर्यंतच्या वारकरी संतांच्या अभंगापैकी एक अभंग घेतात. अभंग म्हटल्यानंतर 'जय जय विठोबा रखुमाई' हे भजन होते. नंतर कीर्तनासाठी घेतलेल्या अभंगाचे सुरुवातीचे कडवे विणेकरी चालीवर म्हणतो. नंतर विठ्ठल, विठ्ठल असे नामस्मरण होते. भजन झाल्यानंतर संपूर्ण अभंगाचे साधे सुस्पष्टपणे उच्चारण करुन कीर्तनास सुरुवात होते. वारकरी कीर्तनात पूर्वरंग व उत्तररंग असे विभाग नसतात. अभंगाचे एकेक कडवे घेऊन त्याचे विवरण केले जाते. विवरणाच्या ओघात विषयास अनुरूप अशी संतवचने प्रमाण म्हणून दिली जातात. ज्ञानेश्वरी, नाथ महाराजाचे भागवत व सर्व वारकरी संतांचे अभंग यातील वचने प्रमाणासाठी प्रायः वापरली जात एकवाक्यतेचा भंग होऊ नये म्हणून वारकरी संताखेरीज इतर संतांची बचने वापरली जात नाहीत, कीर्तनाच्या मूळ विषयाच्या स्पष्टीकरणासाठी चपखल दृष्टांत वापरले जातात. संतांच्या चरित्रातील प्रसंगही समुचितपणे उल्लेखिले जातात.

कीर्तन हा देव, भक्त आणि नाम यांचा त्रिवेणी संगम आहे. कीर्तनामुळे 'जळती दोषाचे डोंगर, शुद्ध होती नारी नर' या दृष्टीने कथाकाळी काही मर्यादांचे पालन कीर्तनकार व भक्त श्रोते या दोघांनीही करायला हवे तुकोबा म्हणतात..

जेथे कीर्तन करावे ।
तेथे न सेवावे ।। धृ।।
बुका लावू नये भाळा ।
माळ घालू नये गळा ।।
तट्टा वृषभासी दाणा ।
तृण मागो नये जाणा ।।२।।
तुका म्हणे द्रव्य घेती ।
देती तेही नरका जाती ।।३।।
(तु.गा. अ.क्र. ३०८४)

या मर्यादा सर्वांनी पाळाव्यात, असे तुकोवा म्हणतात. वारकरी पंथीयांनी आपल्या धर्मप्रचारासाठी एक नवे वाक्पीठ निर्माण केले. त्याची निरुपणे व कीर्तने यांचा थाट अगदी वेगळा आहे. पंडितांच्या पुस्तकी प्रवचनांशी किंवा हरदासांच्या दरबारी कीर्तनाशी त्याचे यत्किंचितही साम्य नाही. लोकांत आत्मीयता आणि आत्मविश्वास उत्पन्न होण्यासाठी लोकांतील पुढारी आघाडीवर यावे लागतात. वारकरी पंथाने लोकांतून धर्मप्रवक्ते तयार केले. नामदेव हा त्यांच्या कीर्तनसंप्रदायाचा आद्यप्रवर्तक होय.

'सुबांचा करदोडा रकट्याली लंगोटी । नामा वाळवंटी कथा करी ।। हे दृश्य शुद्रातिशूद्रांना खरोखरच किती स्फूर्तिदायक वाटले असेल ? आपल्या धर्मजोवनात ही घटना निःसंशय अभूतपूर्व अशीच होती.११ अध्यात्मविधा ही कोणाचीही मक्तेदारी नसून अठरापगड जातीतील कोणालाही कीर्तन करता येते. 'आम्हा कीर्तन कुळवाडी' या भावनेने सर्वसामान्यांनी कीर्तन या माध्यमाचा वापर नामस्मरणासाठी व समाजप्रबोधनासाठी केला.

**– प्रा. डॉ. रत्नाकर चंद्रकांत बेडगे**
**मराठी विभागप्रमुख,**
**महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर**
**मो. ९८२३६९७४०२**

## 'व्हर्च्यूअल रिलिटी रोड सेफ्टी टॅब लॅब' उपक्रम रस्ते अपघातामध्ये घट होण्यास उपयुक्त - उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार



**बारामती/प्रतिनिधी:** उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाच्यावतीने 'व्हर्च्यूअल रिलिटी रोड सेफ्टी टॅब लॅब' या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता निर्माण करण्याचा अभिनव उपक्रम सुरू केला आहे; रस्ते अपघातामध्ये घट होण्यास हा उपक्रम निश्चितच उपयुक्त ठरेल, अशा विश्वास राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केला.

रस्ते अपघातांमध्ये होणाऱ्या नागरिकांच्या मृत्यूमध्ये मोठ्या प्रमाणात घट करण्यासोबतच त्यांच्यामध्ये वाहतूक नियमांविषयी प्रभावीपणे जनजागृती करण्याच्या उद्देशाने भारत केअर्सच्या माध्यमातून उपप्रादेशिक परिवहन कार्यालय येथे उभारण्यात आलेल्या 'व्हर्च्यूअल रिलिटी रोड सेफ्टी टॅब लॅब'ला दिलेल्या भेटीप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी नगराध्यक्ष सचिन सातव, उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी चैतन्य कदम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम, तहसीलदार स्वप्नील रावडे, भारत केअर्सचे वरिष्ठ प्रकल्प समन्वयक राहूल अष्टेकर आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वाहनचालकांना सुरक्षित वाहनचालन, वाहतूक नियम, अपघातांची कारणे व त्यावरील प्रतिबंधात्मक उपायाबाबत दिले जाणारे प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. वाहनचालक, विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांना रस्ता सुरक्षेबाबत जागरूक करण्याच्या या अभिनव उपक्रमाचे कौतुकही त्यांनी केले.

त्या पुढे म्हणाल्या, नागरिकांनी वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करणे, दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा तसेच चारचाकी वाहनचालकांनी सीटबेल्टचा नियमित वापर करणे, वेगमर्यादेचे पालन करणे व वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळणे, हा प्रत्येक नागरिकाचा सामाजिक दायित्वाचा भाग आहे. रस्ते अपघातांमध्ये प्रभावी घट करण्यासाठी शासन, प्रशासन आणि नागरिक यांनी सामूहिक जबाबदारीने कार्य करणे आवश्यक आहे. राज्यातील पहिली प्रयोगशाळा बारामती येथे सुरू करण्यात आली असून या माध्यमातून रस्ते सुरक्षा विषयक नियमांचे पालन होण्यास मदत होणार आहे, असेही उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या.

'व्हर्च्यूअल रिलिटी रोड सेफ्टी टॅब लॅब' बाबत माहिती देताना उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम म्हणाले, भारत केअर्स संस्थेमार्फत देशभरात राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमामुळे विशेषतः युवक, विद्यार्थी, व्यावसायिक वाहनचालक तसेच सर्वसामान्य नागरिकांना प्रत्यक्ष अनुभवातून रस्ता सुरक्षेचे महत्त्व समजण्यासाठी मदत होत आहे. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, बारामती येथे कार्यरत असलेली ही लॅब रस्ता सुरक्षा जनजागृतीसाठी प्रभावी माध्यम ठरत आहे, असेही ते म्हणाले.

०००००००००००००००००००००००००००००

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची संगणक-आधारित परीक्षा पद्धती लागू करण्याचा निर्णय जुलै २०२७ पर्यंत स्थगित



महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Email Id: contact-secretary@mpsc.gov.in Website: https://mpsc.gov.in, https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : एमआयएस-०१२२/प्र.क्र.२८/२०२६/३१ दिनांक: २२ जुलै, २०२६

-:शुध्दिपत्रक:-

विषय :- महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा, महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा पूर्व परीक्षा तसेच महाराष्ट्र गट-क सेवा पूर्व परीक्षा या वर्षातुन दोन किंवा अधिक वेळा घेण्याचा निर्णय स्थगित करण्याबाबत.

संदर्भ :(१) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २५ जून, २०२६ रोजीचे प्रसिध्दीपत्रक
(२) आयोगाचे क्रमांक:संकीर्ण-०१२२/प्र.क्र.३५/२०२६/३१, दिनांक २६ जून, २०२६ रोजीचे प्रसिध्दीपत्रक

आयोगाने संदर्भ क्रमांक १ येथे नमूद दिनांक २५ जून, २०२६ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे सन २०२७ पासून महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा, महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा पूर्व परीक्षा तसेच महाराष्ट्र गट-क सेवा पूर्व परीक्षा या वर्षातून दोन किंवा अधिक वेळा संगणक प्रणालीवर आधारित (CBT) पद्धतीने आयोजित करण्याबाबत जाहीर केले होते.

२. दरम्यान, विविध उमेदवारांकडून प्रस्तुत परीक्षा प्रचलित पद्धतीने (Offline) OMR आधारीत घेण्यासंदर्भात प्राप्त झालेली निवेदने विचारात घेऊन महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा, महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा पूर्व परीक्षा तसेच महाराष्ट्र गट-क सेवा पूर्व परीक्षा या वर्षातून दोन किंवा अधिक वेळा संगणक प्रणालीवर आधारित (CBT) पद्धतीने आयोजित करण्याबाबतचा निर्णय जुलै, २०२७ पर्यंत स्थगित करण्याचा आयोगाने निर्णय घेतला आहे.


ठिकाण : नवी मुंबई

सरिता बांदेकर-देशमुख,
परीक्षा नियंत्रक व सह सचिव,
गोपनीय आणि धोरण व संशोधन,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**मुंबई/प्रतिनिधी:** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा, महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा पूर्व परीक्षा तसेच महाराष्ट्र गट-क सेवा पूर्व परीक्षा वर्षातून दोन किंवा अधिक वेळा संगणक प्रणालीवर आधारित पद्धतीने घेण्याचा निर्णय जुलै २०२७ पर्यंत स्थगित केला आहे. याबाबत आयोगाने शुद्धिपत्रक प्रसिद्ध केले आहे.

आयोगाने २५ जून २०२६ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे २०२७ पासून या परीक्षा वर्षातून दोन किंवा अधिक वेळा संगणक प्रणालीवर आधारित पद्धतीने आयोजित करण्याचा निर्णय जाहीर केला होता. मात्र विविध उमेदवारांकडून प्रस्तुत परीक्षा प्रचलित पद्धतीने (ओएमआर) आधारीत घेण्यासंदर्भात प्राप्त झालेली निवेदने विचारात घेऊन महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा, महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा पूर्व परीक्षा तसेच महाराष्ट्र गट-क सेवा पूर्व परीक्षा या वर्षातून दोन किंवा अधिक वेळा संगणक प्रणालीवर आधारित (सीबीटी) पद्धतीने आयोजित करण्याबाबतचा निर्णय जुलै, २०२७ पर्यंत स्थगित करण्याचा आयोगाने निर्णय घेतला आहे.

# लोकमान्य टिळक : राष्ट्रचेतनेचा अमर दीपस्तंभ



## डॉ. वंदना केंजळे

### लोकमान्य टिळक यांची जयंती. त्यानिमित्त...

विचार हे काळाच्या पलीकडे जातात; व्यक्ती निघून जाते, पण त्याचे विचार समाजाला सतत दिशा देत राहतात. लोकमान्य टिळक यांच्या जयंती दिना निमित्त हा विचार विशेषतः अधोरेखित होतो. भारतीय स्वातंत्र्यलढ्याला वैचारिक अधिष्ठान देणार्या या युगपुरुषाने भारतीय समाजाला केवळ स्वराज्याची प्रेरणा दिली नाही, तर भारतीयांना स्वाभिमान, शिक्षण, राष्ट्रीय चारित्र्य, लोकसहभाग आणि कर्तव्यभावनेची मूल्यव्यवस्था दिली. आज आपण राजकीयदृष्ट्या स्वतंत्र असलो, तरी सामाजिक जबाबदारी, बौद्धिक स्वातंत्र्य, वैज्ञानिक दृष्टिकोन, शिक्षणातील गुणवत्ता, लोकशाहीतील सक्रिय सहभाग आणि राष्ट्रीय एकात्मता या क्षेत्रांत नवनवीन आव्हानांना सामोरे जात आहोत. अशा वेळी लोकमान्य टिळकांचे विचार केवळ इतिहासाचा भाग म्हणून नव्हे, तर वर्तमान आणि भविष्याचा मार्गदर्शक म्हणून समजून घेण्याची गरज आहे.

स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि मी मिळवणारच. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील हा लोकमान्यांचा केवळ एक घोष नव्हता; तो पराधीन भारताच्या आत्मविश्वासाला जागवणारा मंत्र होता. या एका वाक्याने लाखो भारतीयांच्या मनात स्वातंत्र्याची आस निर्माण केली, अन्यायाविरुद्ध लढण्याचे धैर्य दिले आणि राष्ट्रीय स्वाभिमानाची ज्योत चेतवली. लोकमान्य टिळक हे केवळ राजकीय नेते नव्हते. ते शिक्षणतज्ज्ञ, पत्रकार, तत्त्वज्ञ, समाजप्रबोधक, राष्ट्रचिंतक आणि असामान्य संघटक होते. त्यांनी भारतीय राष्ट्रवादाला वैचारिक अधिष्ठान दिले. भारतीयांना आपल्या संस्कृतीचा अभिमान, शिक्षणाचे महत्त्व, लोकशक्तीचे सामर्थ्य आणि स्वराज्याची प्रेरणा दिली.

**आत्मनिर्भर भारत**

१९०५ मध्ये बंगालच्या फाळणीविरुद्ध उभ्या राहिलेल्या स्वदेशी चळवळीला टिळकांनी नवे बळ दिले.
परकीय मालावर बहिष्कार आणि स्वदेशी उद्योगांना प्रोत्साहन हा केवळ आर्थिक कार्यक्रम नव्हता; तो राष्ट्रीय स्वाभिमानाचा प्रश्न होता. भारतीयांनी आपल्या श्रमांवर, उद्योगांवर आणि उत्पादनांवर विश्वास ठेवला पाहिजे, ही त्यामागची भूमिका होती. आज 'आत्मनिर्भर भारत', स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन आणि 'वोकल फॉर लोकल' यांसारख्या संकल्पना पाहताना टिळकांचा स्वदेशीचा विचार नव्या रूपात आपल्या समोर उभा राहतो.टिळकांनी सांस्कृतिक उत्सवांना लोकजागृतीचे व्यासपीठ बनवले. जाती, पंथ आणि आर्थिक स्तर यांच्या पलीकडे जाऊन समाज एकत्र आणण्याचे कार्य त्यांनी केले. आज समाजात वाढणारे ध्रुवीकरण, अविश्वास आणि सामाजिक तणाव पाहता, विविधतेतून एकता आणि राष्ट्रीय एकात्मता हा त्यांचा संदेश महत्त्वाचा वाटतो.

राष्ट्रीय शिक्षण

टिळकांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता-शिक्षण.
त्यांच्यासाठी शिक्षण म्हणजे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन नव्हते; ते राष्ट्रनिर्मितीची प्रक्रिया होती.
ज्ञान, चारित्र्य, विवेक, स्वाभिमान आणि सामाजिक जबाबदारी घडविणारे शिक्षणच समाजाला सक्षम बनवू शकते, असा त्यांचा विश्वास होता. आज कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणाच्या युगात विद्यार्थ्यांना केवळ कौशल्य नव्हे, तर मूल्ये, चिकित्सक विचार आणि राष्ट्रीय बांधिलकी यांचीही गरज आहे. याच ठिकाणी लोकमान्यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान अत्यंत समकालीन ठरते.

१९०८ मध्ये लोकमान्य टिळकांना
राजद्रोहाच्या आरोपाखाली सहा वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आणि त्यांना मंडाले येथील तुरुंगात पाठविण्यात आले. सामान्य माणूस अशा परिस्थितीत खचून गेला असता; परंतु टिळकांनी कारावासालाच चिंतन आणि राष्ट्रसेवेची संधी बनविले. याच काळात त्यांनीगीतारहस्यहा कालजयी ग्रंथ लिहिला. भगवद्गीतेचा त्यांनी केलेला अर्थ हा कर्मयोगाचा अर्थ होता. निष्क्रिय संन्यास नव्हे, तर कर्तव्यपरायण, निःस्वार्थ आणि राष्ट्रहितासाठी समर्पित कर्म हेच जीवनाचे ध्येय - हा त्यांचा संदेश त्यातून त्यांनी दिला.

आजच्या तरुणांसमोर स्पर्धा, मानसिक ताण, करिअरची अनिश्चितता आणि वेगाने बदलणारे सामाजिक वास्तव अशी अनेक आव्हाने आहेत. अशा वेळीगीतारहस्यतील कर्मयोगाची शिकवण त्यांना धैर्य, संयम आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांची प्रेरणा देते. परिस्थिती बदलण्याची वाट पाहण्यापेक्षा स्वतः कृतीशील होणे, हीच लोकमान्यांची शिकवण आजच्या युवकांसाठी उपयुक्त आहे. आज भारतासमोर 'विकसित भारत २०४७'चे ध्येय आहे. आर्थिक प्रगती, तंत्रज्ञान, डिजिटल क्रांती, अंतराळ संशोधन आणि जागतिक नेतृत्व या क्षेत्रांत भारत झपाट्याने वाटचाल करीत आहे. परंतु विकसित राष्ट्राची खरी ओळख केवळ आर्थिक प्रगतीत नसते.
चारित्र्यवान नागरिक, गुणवत्तापूर्ण शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक समरसता आणि राष्ट्रीय जबाबदारी यांवरच राष्ट्राची खरी उभारणी होते. लोकमान्य टिळकांनी शंभर वर्षांपूर्वी मांडलेले विचार आज अधिक व्यापक अर्थाने समोर येत आहेत.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मूल्याधिष्ठित शिक्षण, भारतीय ज्ञानपरंपरा, मातृभाषा, संशोधन, नवोन्मेष आणि कौशल्यविकास यांवर भर देते. त्यांनी शिक्षणाला व्यक्तिमत्त्व विकास आणि राष्ट्रनिर्मितीचे साधन मानले. शिक्षणाने केवळ रोजगार निर्माण करू नये, तर जबाबदार नागरिक घडवावेत, हा त्यांचा आग्रह होता. डिजिटल युगात माहिती सहज उपलब्ध होते; परंतु माहिती आणि ज्ञान यांत मूलभूत फरक आहे. सामाजिक माध्यमांवर अफवा, द्वेषपूर्ण संदेश आणि अप्रमाणित माहिती वेगाने पसरते. अशा वेळी चिकित्सक विचार, सत्याची शहानिशा आणि विवेकपूर्ण संवाद ही लोकमान्यांच्या पत्रकारितेची शिकवण अधिक महत्त्वाची ठरते. 'केसरी'च्या माध्यमातून त्यांनी निर्भय, तथ्याधिष्ठित आणि लोकहितवादी पत्रकारितेचा आदर्श घालून दिला. पत्रकारिता ही लोकमत घडविण्याची नैतिक जबाबदारी आहे, हे त्यांनी आपल्या लेखणीतून सिद्ध केले.

**आत्मविश्वास जागवला**

लोकमान्य टिळकांचे सर्वांत मोठे योगदान म्हणजे त्यांनी भारतीयांना आत्मविश्वास दिला. गुलामगिरीत जगणार्या समाजाला त्यांनी स्वतःच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवायला शिकवले. स्वराज्याचा त्यांचा विचार आज आत्मनिर्भरता, नवोन्मेष, सामाजिक न्याय, संविधानिक मूल्यांचा आदर आणि जबाबदार नागरिकत्व या स्वरूपात पुढे नेण्याची गरज आहे. आज लोकमान्य टिळकांना सर्वात मोठी आदरांजली कोणती, तर त्यांच्या विचारांना आधुनिक भारताच्या जीवनात कृतीरूप देणे. शिक्षणात गुणवत्ता, संशोधनात प्रामाणिकता, सार्वजनिक जीवनात पारदर्शकता, समाजजीवनात समरसता आणि राष्ट्रजीवनात स्वाभिमान या मूल्यांचा स्वीकार करणे, हेच त्यांच्या स्वराज्याच्या संकल्पनेचे आधुनिक रूप आहे. लोकमान्य टिळकांचे व्यक्तिमत्त्व काळाच्या पलीकडे जाणारे आहे. त्यांच्या विचारांमध्ये इतिहासाचे भान आहे, वर्तमानाची जाणीव आहे आणि भविष्याची दिशा आहे. आजच्या पिढीला लोकमान्य टिळकांकडून केवळ इतिहास शिकण्याची गरज नाही; तर भविष्य घडविण्याची प्रेरणा घेण्याची गरज आहे. कारण राष्ट्रे केवळ तंत्रज्ञानाने महान होत नाहीत; ती महान होतात विचारांनी, मूल्यांनी आणि जबाबदार नागरिकांनी. लोकमान्य टिळकांचे विचार हीच त्या दिशेने वाटचाल करण्याची प्रेरक शक्ती आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना, त्यांच्या विचारांचे केवळ स्मरण नव्हे तर आचरण करण्याचा संकल्प करूया. हीच लोकमान्यांना खरी अर्थपूर्ण आदरांजली ठरेल.

**स्वराज्याची ज्योत पेटविणार्या त्या युगपुरुषाला अभिवादन!**

---

# तुळशीची माळ परिधान केल्याने होणारे फायदे







**संत तुकाराम महाराज यांच्या एका अभंगात छान ओळी आहेत.**

**गोपीचंदनउटी तुळशीच्या माळा**
**हार मिरविती गळां ।**
**टाळ मृदुंग घाई पुष्प वर्षाव**
**अनुपम्य सुखसोंहळा रे ।**

श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी जमलेले वैष्णव-वारकरी चंद्रभागेच्या वाळवंटात मोठ्या आनंदाने पांडुरंगांचा जयघोष करत आहेत. आणि त्या प्रसंगाचे वर्णन करणारा हा अभंग आहे. सगळ्या वारकऱ्यांनी गळ्यात त्यांच्या लाडक्या दैवताला प्रिय असलेली वैजयंती माळ अर्थात तुळशीची माळ घातली आहे. या तुळशीच्या माळेचं एवढं महत्त्व का आहे ते आपण पाहू या.

**आध्यात्मिक महत्त्व**

हिंदू धर्मात तुळशीला खूप महत्त्व आहे. रोज तुळशीला पाणी अर्पण करणे, संध्याकाळी तुळशीच्या रोपाजवळ सांजदिवा लावणे, तुळशीची पानं खाणे, माळ घालणे यापासून संबंधित अनेक गोष्टी भारतीय परंपरेचा एक महत्त्वाचा भाग आहेत. तुळशीची माळ, ज्याला तुळशीचे मणी किंवा तुळशीची जपमाळ म्हणूनही ओळखले जाते, हा केवळ एक अलंकार नाही. हा पवित्र तुळशीच्या रोपापासून बनवलेला गुणकारी हार आहे, जो हिंदू धर्मात त्याच्या आध्यात्मिक महत्त्वासाठी आणि दैवी अस्तित्वाशी जोडलेला आहे.

समर्पण आणि भक्तीचे प्रतीक

सुवासिक लाकडापासून बनवलेल्या सुंदर नेकलेसची कल्पना करा. तुळशीची माळ पारंपारिक पद्धतीनुसार १०८ मणी असलेली परिधान केली जाते. १०८ ह्या संख्येला आध्यात्मिक महत्त्व आहे. पण त्याचे महत्त्व अधिक खोलवर जाते. भगवान विष्णू आणि भगवान श्रीकृष्णाचे भक्त विशेषतः, या देवतांना समर्पण आणि भक्तीचे प्रतीक म्हणून तुळशीची माळ धारण करतात. तुळशीच्या रोपाला लक्ष्मी, समृद्धीची देवी आणि विष्णूची पत्नी यांची पृथ्वीवरील अस्तित्वखूण मानले जाते. तुळशीची माळ धारण करून हे दैवी शक्तीचा एक तुकडा आपल्या हृदयाच्या जवळ घेऊन जाण्यासारखे आहे.

माळ कशी बनवतात?

तुम्ही कधी विचार केला आहे का की त्या सुंदर तुळशीच्या माळा किंवा प्रार्थना/जपाचे मणी कशा बनवल्या जातात? हे पवित्र हार, परंपरेने पवित्र तुळशीच्या रोपापासून बनवलेले, ध्यान आणि नामस्मरणासाठी परिधान केले जातात. स्वतःची तुळशीची माळ बनवणे हा एक अर्थपूर्ण आणि वैयक्तिक अनुभव असू शकतो.

ही प्रक्रिया तुळशीच्या रोपापासून सुरू होते. पारंपारिकपणे केवळ नैसर्गिकरित्या पडलेल्या फांद्या वापरल्या जातात. या फांद्या नंतर उन्हात वाळवल्या जातात. कोरडया झाल्यावर लाकूड काळजीपूर्वक लहान मण्यांच्या आकारामध्ये कापले जाते. प्रत्येकाचा आकार गोल आणि गुळगुळीत केला जातो. स्ट्रिंगिंगसाठी प्रत्येक मणीच्या मध्यभागी एक लहान छिद्र ड्रिलद्वारे केले जाते.

शेवटी माळ गुंफण्याची वेळ येते. तुळशीचे मणी परंपरेने पवित्र धाग्यावर बांधले जातात. बहुतेकदा हे धागे रेशीम किंवा कापसाचे बनलेले असतात. माळेमध्ये सामान्यतः १०८ मणी असतात. याच्या शेवटी थोडा मोठा मणी असतो, ज्याला सुमेरू मणी म्हणतात. या संपूर्ण प्रक्रियेसाठी वेळ आणि संयम लागू शकतो. परंतु परिणामी माळ हे एक सुंदर आणि प्रेमळ आध्यात्मिक साधन आहे.

वैज्ञानिक दृष्टिकोनातून तुळशीचे फायदे

वैज्ञानिक दृष्टिकोनातून तुळशीचे अनेक फायदे आहेत. आज तुळशीशी संबंधित अशाच फायद्याविषयी बोलू या. ही गोष्ट व्यक्तीच्या मानसिक आरोग्याशी संबंधित आहे. हा संबंध तुळशीची माळ धारण करणे आणि चांगले मानसिक आरोग्य असणे याविषयी आहे. सहसा भगवान विष्णू आणि भगवान कृष्णाचे भक्त तुळशीच्या मण्यांची माळ घालताना दिसतात.

**आरोग्यदायी तुळस**

तुळशीची माळ धारण केल्याने मन शांत आणि आत्मा शुद्ध होतो.

---

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा




खरं तर शीघ्रपतन हा काही आजार नाही. ती एक सवय आहे. पुरुषांच्या लैंगिक प्रतिसादात लैंगिक उत्तेजना, शिश्नाची ताठरता व वीर्यस्खलन या प्रक्रिया होतात. स्खलन झाल्यानंतर ताठरता कमी होत-होत नष्ट होते. शीघ्रपतनावर उपचार करताना या लैंगिक प्रतिसादावर विशेष लक्ष द्यावं लागतं.डॉ. संजय देशपांडे, कन्सल्टंट सेक्सॉलॉजिस्टखरं तर शीघ्रपतन हा काही आजार नाही. ती एक सवय आहे. **(क्रमश. )**

## २ Joke — विनोद




बाबू - तुझे वडील किती वर्षाचे आहेत.
राजू - माझ्याच वयाचे आहेत.
बाबू - अरे पण हे कसं शक्य आहे.
राजू - का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना स!

## ३ Message — संदेश




Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game khelteho?
santa-mobile mai snake wala .

## ४ Thought — सुविचार



ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.- डॉन प्याट

**संस्कृत सुभाषित**


**रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।**
**देशे देशे गुणष्वेव मवस्थास्वमविक्रिय:।।**

**मराठीत अर्थ**

आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

---

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

२. शेवट, मावळणे
३. अकबराशी शर्थीने लढणारा शूर राजपूत
७. ताठा
८. प्रतिबंध
१०. समेट
११. झेप
१२. व्यवस्थित
१६. शपथ
१७. आकाश
१९. दासी
२०. स्वयंपाकाची कला
२१. दहशत
२३. दारुमुळे निकामी होणारा अवयव
२४. जिन्नस
२५. राजाची पत्नी
२६. त्वरित
२८. वर्ष
३०. हत्ती
३२. सूर्य
३४. भारताच्या दक्षिणेचा समुद्र
३८. वाटाड्या
४०. ओळ
४१. लहान
४२. पाणी
४३. पाणी
४३. समानता
४५. जास्त किमतीचे
४६. व्यापारी
४७. एक कडसर पालेभाजी
४९. मुलाची पत्नी
५०. अपशकुन
५२. पालखी
५३. अश्व
५४. पोहणे
५६. डोके
५७. बूड
५८. रावणाची मुखे
५९. हस्त
६०. पाश्चात्त्य स्नानपात्र
६१. मार्ग
६२. अपराध्याच्या वतीने घातलेली भीड
६४. छोटा
६६. स्त्री
६८. परिणय
६९. घट्ट
७०. नस
७१. झोप
७३. वात्सल्य
७४. आजार
७६. मिठी
७९. आईची बहीण
८२. पुष्कळ (ग्रामीण)
८४. बंगाली मिठाई प्रकार
८७. रुची, पसंती
८८. विपुल
८९. सरशी

### उभे शब्द

१. आटोपशीर आकारचे
२. भूमी
४. रूढी
५. अंगिकार, स्वीकार
६. वनराज
७. नोकर
९. पुष्कळ
११. जमीन व पाणी यापैकी कोठेही राहू शकणारा सजीव
१३. पत्र
१४. सूतकताईचे साधन
१५. मिश्रण, खिचडी
१६. थालिपीठ वा चकलीचे पीठ
१८. पूर्वज
२२. शक्ती
२४. अपमान
२५. राजाची आई
२७. गांधीजींचे एक तत्त्व
२८. सारखा
२९. तल्लीन
३१. सुखी माणसाचे वस्त्र
३३. वीर स्त्री
३५. केविलवाणा
३६. कुत्रा (सं.)
३७. आवड
३९. दुर्दैव
४४. प्रासाद
४८. पुन्हा
५१. ताजेपणा
५२. कृपा
५३. स्वयंपाकात तसेच सौंदर्य प्रसाधनातही वापरला जाणारा पिवळे चूर्ण
५४. प्रखर
५५. तृष्णा
५७. झाकीर हुसेन यांचे वाद्य
६०. टिंगल
६३. सहजी
६५. नुकसानकारक
६६. मराठी माणसाची प्रिय करमणूक
६७. शांतता
७२. झुंड
७३. मक्षिका
७५. ताकद
७७. आशीर्वाद
७८. वन, बाग
८०. पारंब्या असलेले झाड
८१. आदर
८३. शाहिराचे वाद्य
८५. सांप्रत
८६. ध्येय

### आडवे उत्तरे

२.अस्त ३.राणा प्रताप सिंह ७.गर्व ८.अटकाव १०.तह ११.उडी १२.नीटनेटका १६.भाक १७.नभ १९.बटीक २०.पाककला २१.जरब २३.यकृत २४.माल २५.राणी २६.लगेच २८.सन ३०.गज ३२.रवी ३४.हिंदी महासागर ३८.मार्गदर्शक ४०.रांग ४१.सान ४२.नीर ४३.समता ४५.महाग ४६.वाणी ४७.मेथी ४९.सून ५०.नाट ५२.मेणा ५३.हय ५४.जलतरण ५६.शीर्ष ५७.तळ ५८.दहा ५९.हात ६०.टब ६१.वाट ६२.रदबदली ६४.लहान ६६.नार ६८.लग्न ६९.दाट ७०.धमनी ७१.नीज ७३.माया ७४.विकार ७६.कव ७९.मावशी ८२.रगड ८४.रसमलई ८७.आवड ८८.मुबलक ८९.फत्ते

### उभे उत्तरे

१.सुटसुटीत २.अवनी ४.प्रथा ५.पतकर ६.सिंह ७.गडी ९.अनेक ११.उभयचर १३.टपाल १४.टकळी १५.काला १६.भाजणी १८.पितर २२.बल २४.मानहानी २५.राजमाता २७.अहिंसा २८.सन २९.दंग ३१.सदरा ३३.वीरांगना ३५.दीनवाणा ३६.सारमेय ३७.रस ३९.कमनशीब ४४.महाल ४८.परत ५१.टवटवी ५२.मेहरबानी ५३.हळद ५४.जहाल ५५.तहान ५७.तबला ६०.टर ६३.लीलया ६५.हानिकारक ६६.नाटक ६७.सामसूम ७२.जमाव ७३.माशी ७५.रग ७७.वर ७८.रई ८०.वड ८१.आब ८३.डफ ८५.सध्या ८६.लक्ष्य



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### दोन वेळच्या विश्वविजेत्यांवर पुन्हा वर्ल्ड कपमधून बाहेर पडण्याचे संकट

**मुंबई** –आयसीसीनं २०२७ च्या वनडे विश्वचषकासाठी थेट पात्रतेचे नियम आणि अंतिम मुदत अधिकृतपणे जाहीर केली आहे. आयसीसीच्या या नवीन नियमामुळं आणि अंतिम मुदतीमुळं, दोन वेळा विश्वविजेता ठरलेल्या वेस्ट इंडिज क्रिकेट संघावर पुन्हा एकदा मुख्य विश्वचषकातून बाहेर पडण्याचं संकट आलं आहे. आयसीसीच्या नवीन अधिसूचनेनुसार, वनडे विश्वचषकात थेट प्रवेशासाठी अंतिम मुदत ३० सप्टेंबर, २०२६ अशी निश्चित करण्यात आली आहे. केवळ तेच संघ विश्वचषकात थेट प्रवेश मिळवतील, जे ३० सप्टेंबर, २०२६ पर्यत आयसीसी वनडे क्रमवारीत आपलं मजबूत स्थान टिकवून ठेवतील. उर्वरित संघांना पात्रता फेरीतून जावे लागेल.किती संघ ठरणार थेट पात्र : वनडे विश्वचषकासाठी थेट पात्रतेचे नियम पूर्णपणे पारदर्शक आणि स्पष्ट आ–हेत. आयसीसीच्या नियमांनुसार, स्पर्धेचं यजमानपद भूषवणारे पूर्ण सदस्य देश कोणत्याही क्रमवारीच्या अडचणींशिवाय थेट पात्र ठरतात. या नियमाचा फायदा घेत, यजमान दक्षिण आफ्रिका आणि झिम्बाब्वे यांनी २०२७ च्या विश्वचषकासाठी आपलं स्थान आधीच निश्चित केलं आहे. या दोन यजमान देशांव्यतिरिक्त, अंतिम तारखेनुसार आयसीसीच्या अधिकृत वनडे क्रमवारीत अव्वल आठ संघ मुख्य स्पर्धेसाठी थेट पात्र ठरतील.

### वैभव आज ॲक्शनमध्ये! हा खेळाडू करणार टीम इंडियासाठी पदार्पण

दिल्ली,–भारत विरुद्ध झिम्बाब्वे यांच्यामध्ये आजप–ासून टी२० मालिकेला सुरुवात होणार आहे, या मालिकेचा पहिला सामना आज खेळवला जाणार आहे. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ आपल्या पहिल्या विजयाच्या शोधात आहे आणि पराभवाची मालिका खंडित करण्यासाठी संघ गुरुव–ारी हरारे येथे खेळत आहेत. मागील तीन मालिकांम ध्ये झालेल्या पराभवांनंतर टीम इंडियासाठी ही मालिका महत्वाची असणार आहे. या सामन्यात भारताच्या संघाने नाणेफेक जिंकून पहिले गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. या सामन्यात आज भारताचा युवा खेळाडू टीम इंडियासाठी पदार्पण करणार आहे, त्याचबरोबर वैभव सूर्यवंशी देखील टीम इंडियासाठी आज खेळताना दिसणार आहेत. भारताच्या संघात आज काही महत्वाचे बदल करण्यात आले आहेत, या सामन्यामध्ये अशोक शम ला संधी देण्यात आली आहे, तर मयंक यादवने पहिल्याच ओव्हरमध्ये पहिल्या चेंडूवर विकेट घेतली आणि भारताच्या संघाला पहिला विकेट मिळवून दिला. इंग्लंडविरुद्धच्या शेवटच्या टी२० सामन्यातील भारताच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये आजच्या प्लेइंग इलेव्हनच्या तुलनेत पाच बदल करण्यात आले आ–हेत. संजू सॅमसनच्या जागी वैभव सूर्यवंशी आहे.

### कॉमनवेल्थ गेम्समधील देशाचे पहिले पदक निश्चित, बॉक्सर लव्हलिना बोरगेहेनचे पदकावर शिक्कामोर्तब

दिल्ली,–स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ आयोजित केल्या जात आहेत. यंदाच्या या स्पर्धेत १९ पैकी फक्त १० खेळांचा सहभाग असल्याने भारताच्या पदकांच्या संख्येत मोठी घट होणार आहे. पण २३ जुलै रोजी होणाऱ्या उद्घाटन समारंभापूर्वी भारतासाठी एक आनंदाची बातमी आली आहे. कॉमनवेल्थ गेम्समधील भारताचं पहिलं पदक निश्चित झालं आहे. पाहूया नेमकं कसं? यंदा राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत क्रिकेट, हॉकी, बॅडमिंटन, रेसलिंग, स्क्वॉश, टेटे, डायव्हिंग, रग्बी, नेमबाजी या मोठ्या स्पर्धांचा समवेश नसणार आहे. त्यामुळे भारताच्या महत्त्वाच्या खेळांतील पदकं आता संघाच्या नावे नसतील. त्यामुळे आता सहभाग असलेल्या इतर खेळांमध्ये भारताच्या खेळाडूंना म ोठी मेहनत घ्यावी लागणार आहे. याचदरम्यान आता स्पर्धेपूर्वीच भारताचं एक पदक नक्की झालं आहे. महिलांच्या ७५ किलो वजनी गटातील बॉक्सिंग प्रकारात लव्हलिना बोरगोहेनचे पदक किमान कांस्य पदक निश्चित झालं आहे. याचं कारण म्हणजे, उपांत्यपूर्व फेरीत तिच्याशी लढणाऱ्या प्रतिस्पर्धीने स्पर्धेतून माघार घेतली आहे; त्यामुळे लव्हलिना थेट उपांत्य फेरीत पोहोचली व पदक पक्कं झालं.

### इंग्लंड विरुद्ध ऑस्ट्रेलिया ॲशेस मालिकेचे वेळापत्रक जाहीर

दिल्ली,–ॲशेस मालिका ही इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही बलाढ्य संघांमध्ये होणारी सर्वात प्रतिष्ठित मालिका आहे. या मालिकेला १४४ वर्षांचा इतिहास आहे. त्यामुळे ही मालिका दोन्ही संघांसाठी वर्ल्डकप जिंकण्यापेक्षा कमी नसते. दोन्ही संघातील क्रिकेट चाहते या मालिकेची आ–तुरतेने वाट पाहत असतात. दरम्यान ही मालिका केव्हा सुरु होणार, याबाबत अधिकृत माहिती समोर आली आहे. इंग्लंड क्रिकेट बोर्डाने आपल्या होम सिझनच्या मालिकांचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. यादरम्यान ॲशेस २०२६ स्पर्धेच्या वेळापत्रकाचीही घोषणा करण्यात आली आहे. दरम्यान ही मालिका केव्हा सुरु होणार? जाणून घ्या. येत्या २०२७ मध्ये इंग्लंडचं वेळापत्रक व्यग्र असणार आहे. या वर्षात इंग्लंडचा सामना बांगलादेश, न्यूझीलंड आणि पाकिस्तानविरूद्ध होणार आहे. यासह ॲशेस मालिकेचा थरारही रंगणार आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणाऱ्या ॲशेस मालिकेची सुरुवात ही १८ जूनप–ासून होणार आहे. मालिकेतील पहिला सामना नॉटिंगहॅमच्या मैदानावर खेळवला जाणार आहे. तर मालिकेतील शेवटचा सामना २९ जुलैपासून लंडनमधील द ओव्हलच्या मैदानावर खेळ–

# वैभव सूर्यवंशीची ऐतिहासिक कामगिरी!

## आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अर्धशतक झळकावणारा सर्वात तरुण खेळाडू

हरारे–:भारत विरुद्ध झिम्बाब्वे यांच्यामध्ये पहिला मालिकेचा टी२० सामना खेळवला जात आहे, २३ जुलै रोजी हरारे स्पोर्ट्स क्लब येथे खेळला जात आहे. या सामन्यासाठी भारतीय संघात वैभव सूर्यवंशीला सलामीवीर म्हणून स्थान देण्यात आले आहे. वैभव सूर्यवंशीने भारताला वेगवान सुरुवात करून दिली, पण अभिषेक शर्मा केवळ एक धाव काढून बाद झाला. झिम्बाब्वेने भार–तासमोर १२६ धावांचे लक्ष्य ठेवले आहे. या मालिकेमध्ये टीम इंडियाच्या संघाने पहिला विकेट लवकर गमावला त्यानंतर वैभव सूर्यवंशी याने संघासाठी अर्धशतक झळकावले आहे. या सामन्यातील कामगिरीचा अहवाल सविस्तर वाचा.



भारत विरुद्ध झिम्बाब्वे यांच्यामध्ये सुरु असलेल्या सामन्यात वैभवने टीम इंडियासाठी १८ चेंडूमध्ये ५० धावा केल्या. यामध्ये त्याने ४ चौकार आणि ४ षटकार मारले. या सामन्यामध्ये त्याने टीम इंडियासाठी चांगली सुरुवात करुन दिली, त्याचे अर्धशतक झाल्यानंतर तो बाद झाला. अभिषेक शर्मा आजच्या सामन्यामध्ये फार काही मोठी खेळी खेळू शकला नाही. त्याने आजच्या सामन्याम ध्ये संघासाठी १ धाव केली आणि ८ चेंडू खेळून बाद झाला.

वैभव सूर्यवंशीच्या नावावर नवा रेकॉर्ड

वैभव सूर्यवंशी हा १५ वर्षे आणि ११८ दिवसांचा असताना टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अर्धशतक झळकावणारा सर्वात तरुण खेळाडू आहे. त्याने २३ जुलै, २०२६ रोजी हरारे येथे झिम्बाब्वेविरुद्ध हा पराक्रम केला. या यादीत दुसऱ्या क्रमांकावर जिब्राल्टरचा लुईस ब्रूस आहे, ज्याने २०२१ मध्ये अल्बर्टा येथे माल्टाविरुद्ध वयाच्या १६ वर्षे आणि ५६ दिवसांनी हा पराक्रम केला. या यादीत तिसऱ्या क्रमांकावर इंडोनेशियाचा केविन चड्ढा आहे, ज्याने २०२६ मध्ये बाली येथे स्वीडनविरुद्ध वयाच्या १६ वर्षे आणि ७६ दिवसांनी अर्धशतक झळकावले.

या यादीत चौथ्या क्रमांकावर सिएरा लिओनचा एलुसिन तुरे आहे, ज्याने २०२६ मध्ये बेनोनी येथे घानाविरुद्ध वयाच्या १६ वर्षे आणि ८९ दिवसांनी अर्धशतक झळकावले. या यादीत पाचव्या क्रमांकावर भूतानी क्रिकेटपटू तेन्झिन राबगी आहे, ज्याने २०२३ मध्ये क्वालालंपूर येथे चीनविरुद्ध वयाच्या १६ वर्षे आणि ११८ दिवसांनी अर्धशतक झळकावले.

## अभिषेक शर्मा पुन्हा फ्लॉप

### , बेबी बॉसचे झिम्बाब्वे विरुद्ध वादळी अर्धशतक



हरारे–भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात हरारे येथे पहिली टी २० मॅच सुरु आहे. या मॅचमध्ये झिम्बाब्वेनं प्रथम फलंदाजी करताना ७ बाद १२५ धावा केल्या. भारतासमोर विजयासाठी १२६ धावांचं आव्हान होतं. भारताच्या डावाची सुरुवात खराब झाली. अनुभवी सलामीवीर अभिषेक शर्मा केवळ १ रन करुन बाद झाला. टीम इंडियाचा बेबी बॉस अशी ओळख मिळालेल्या वैभव सूर्यवंशीनं झिम्बाब्वे विरो–धात १८ बॉल ५० धावा केल्या. अर्धशतक झाल्यानंतर वैभव सूर्यवंशी लगेचच बाद झाला.

वैभव सूर्यवंशीचं पहिलं अर्धशतक

वैभव सूर्यवंशीनं इंग्लंड विरो–धातील टी २० मालिकेत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केलं होतं. त्या मालिकेत वैभवला मोठी खेळी करता आली नव्हती. मात्र, झिम्बाब्वेम ध्ये वैभव सूर्यवंशीनं पुन्हा वादळी फलंदाजी केली आहे. वैभवनं अर्धशतकी खेळीमध्ये ४ षटकार आणि ४ चौकार मारले. अर्धशतक केल्यानंतर वैभव सूर्यवंशी रिचर्ज नगरावा याच्या गोलंदाजीवर बाद झाला. वैभव सूर्यवंशीनं अंडर–१९ वर्ल्ड कपम ध्ये इंग्लंड विरोधातील फायनलम ध्ये हरारेच्या स्टेडियमवरच १७५ धावांची खेळी केली होती.

वैभव सूर्यवंशींन आजच्या ५० धावांच्या खेळीसह आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पहिलं अर्धशतक केलं आहे. झिम्बाब्वेचं भारतासम ोर १२५ धावांचं आव्हान

भारताचा कर्णधार श्रेयस अय्यर यानं टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. झिम्बाब्वेनं प्रथम फलंदाजी करताना ७ बाद १२५ धावा केल्या आहेत. युवा गोलंदाज मयंक यादव यानं पहिल्याच बॉलवर झिम्बाब्वेला धक्का दिला. मयंक यादव, अशोक शर्मा, प्रिन्स यादव या तिघांच्या माऱ्यासमोर झिम्बाब्वेचे फलंदाज टिकू शकले नाहीत.

मयंक यादवनं पहिल्याच बॉलवर ब्रायन बेनेट याला बाद केलं. टी २० मॅचमध्ये पहिल्याच बॉलवर विकेट घेणारा मयंक यादव हा भारताचा चौथा फलंदाज ठरला आहे. भुवनेश्वर कुमार, हार्दिक पांड्या या दोघांनी तीन तीन वेळा अशी कामगिरी केली आहे. अर्शदीप सिंग यानं दोन वेळा पहिल्या बॉलवर विकेट घेतली आहे.

भारताचा वेगवान गोलंदाज अशोक शर्मा यानं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केलं आहे. आजच्या मॅचमध्ये अशोक शर्माला एकही विकेट मिळाली नाही. मात्र, त्यानं ४ ओव्हरमध्ये २९ धावा दिल्या. झिम्बाब्वेचा निम्मा संघ ६४ धावांवर बाद झाला. वेसली मधेवेरे आणि तादिवानाशे मारुमानी यांच्यातील ५७ धावांच्या भागीदारीमुळं झिम्बाब्वेला १०० धावांचा टप्पा पार करता आला.

आयसीसी ने डब्ल्युटीसी फायनलची तारीख आणि स्टेडियम ठरवले

## ऑस्ट्रेलिया पहिल्या स्थानी, भारत कितव्या स्थानी?



नवी दिल्ली–जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्याची तारीख आणि ठिकाण निश्चित करण्यात आलं आहे. डब्ल्यूटीसीची फायनल लंडनम धील द ओव्हल मैदानावर खेळ–वली जाईल. यापूर्वी २०२३ च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेची फायनल खेळवली गेली होती. ऑस्ट्रेलियानं भारताला पराभूत करत जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचं विजे–तेपद मिळवलं होतं. डब्ल्यूटीसी २०२५–२७ ची फायनल पुढील वर्षी ९ जून ते १३ जून दरम्यान होईल. आयसीसीनं गेल्या वर्षी स्पष्ट केलं होतं की पुढील तीन डब्ल्यूटीसी स्पर्धांच्या फायनल इंग्लंडमोद्ये होतील. याचा अर्थ २०२७, २०२९ आणि २०३१ च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेची फायनल इंग्लंडमध्ये खेळवली जाईल. यापूर्वीच्या तीन अंतिम स्पर्धांची फायनल देखील इंग्लंडमध्येच झाली होती. जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेची फायनल २०२३ मध्ये भारत आणि ऑस्ट्रेलियामध्ये झाली होती. ऑस्ट्रेलियानं तो सामना २०९ धावांनी जिंकला होता. भारत २०२१ आणि २०२३ मध्ये डब्ल्यूटीसीच्या अंतिम फ ेरीमध्ये पोहोचला होता. मात्र, दोन्ही फायनलमध्ये भारताचा पराभव झाला होता. डब्ल्युटीसी च्या गुणतालिकेत भारत कितव्या स्थानावर?जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या फायनलमध्ये कोणते दोन संघ आमने सामने येणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ऑस्ट्रेलिया गुणतालिकेत पहिल्या स्थानावर असून दक्षिण आफ्रिका दुसऱ्या स्थानावर आहे. डब्ल्यूटीसीच्या गुणतालिकेत पहिल्या दोन स्थानांवर अशलेल्या संघांमध्ये फायनल होते. तिसऱ्या स्थानावर न्यूझीलंड आहे. विशेष बाब म्हणजे बांगलादेश चौथ्या स्थानावर असून भारत पाचव्या स्थानावर आहे. जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम साम न्यात दोन वेळा पोहोचणाऱ्या टीम इंडियाचा मार्ग खडतर असल्याचं पाहायला मिळतंय. भारताला अंतिम सामन्यात पोहोचण्याची आशा कायम ठेवायची असल्यास राहिलेल्या कसोटी सामन्यांम ध्ये भारताला विजय मिळवणं आवश्यक आहे. जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचं विजे–तेपद न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेनं मिळवलं आहे. दरम्यान दोन वेळा अंतिम फेरीत पोहोचणाऱ्या भारताला डब्ल्यूटीसीचं विजेतेपद मिळवता आलेलं नाही. भारताच्या कसोटी टीममध्ये मोठे फेरबदल झाले आहेत. रोहित शर्मा, विराट कोहली कसोटीतून निवृत्त झाले आहेत. गौतम गंभीर यांच्याकडे प्रशिक्षकपद गेल्यानंतर भारताला घरच्या मैदानावर न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका यांच्याकडून पराभव स्वीकारावा लागला.

## सरकारवर विश्वास ठेवा...शिखर धवनच्या वक्तव्यावर सीजेपी आंदोलक भडकले, खेळाडू सोशल मिडियावर ट्रोल

दिल्ली,२३ जुलै (पीएसआय)

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनावर माजी भारतीय क्रिकेटपटू शिखर धवननेही प्रतिक्रिया दिली आहे. युवराज सिंगच्या पाठोपाठ शिखर धवननेही विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा दर्शवला आहे. या माजी भारतीय क्रिकेटपटूने सोशल मीडिया पोस्टद्वारे विद्यार्थ्यांना आपला पाठिंबा व्यक्त केला आहे. आपल्या इंस्टाग्राम स्टोरीमध्ये धवनने विद्यार्थ्यांना देशाचे भविष्य म्हटले असून शांततापूर्ण आंदोलनाचे आव–ाहन केले आहे. धवन म्हणाला की, कठीण काळात संयम आणि संस्था व सरकारवर विश्वास ठेवणे आवश्यक आहे. मात्र, जनता पक्षाचे (सीजेपी) राष्ट्रीय प्रवक्ते आशुतोष रांका यांनीही धवनच्या पोस्टवर प्रतिक्रिया दिली आहे.

सोशल मिडियावर धवनने लिहीले आहे की, सध्याची तरुण पिढी ही आपल्या देशाचे भविष्य आहे त्यामुळे त्याचे मुद्दे आणि त्यांची स्वप्ने समजून घेणे गरजेचे आहे. पण यावेळी कठीण काळामध्ये संयम राखणे आणि आपल्या संस्था व सरकारवर विश्वास ठेवणे हे तितकेच महत्त्वाचे आहे.



माझा या घटनेवर विश्वास असा आहे की प्रत्येक आव्हानावर संयम हाच उपाय आहे असे मला वाटते, भारताने नेहमीच प्रगती केली आहे आणि पुढेही करत राहील.'' असे शिखर धवनने सांगितले. युवराज सिंगने त्याच्या सोशल मिडियावर सांगितले की, ''प्रत्येक मूल, विद्यार्थी, स्त्री आणि पुरुषाला शांततेत शिकण्याची, सुरक्षिततेत वाढण्याची आणि आपली स्वप्ने साकार करण्याची संधी मिळायला हवी. तुमचे कल्याण आणि समृद्धी हाच एका उज्ज्वल भारताचा पाया आहे. चला, आपण एकत्र मिळून काळजी, संधी आणि आशेने भरलेला समाज घडवूया. संवादातून आपण भारताच्या भविष्यासाठी सामंजस्यपूर्ण तोडगा काढू शकतो.'' असे युवराज सिंगने सांगितले आहे. मागील काही दिवसांपासून सातत्याने हे आंदोलन अधिकच आक्रमक झाले आहे, विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करण्यात आला आहे, त्यामुळे आता शिक्षण मंर्त्याच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. मागील काही दिवसांपासून पेपरफुटीमुळे विद्यार्थी आक्रमक झाले आहेत, आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी ट्विटर खात्यावरून घोषणा केली आहे. यामध्ये ते म्हणाले की, पेपरफुटीसाठी जबाबदार असलेल्यांना शिक्षा दिली जाणार आहे. या घटनेची जलदगती न्यायालये स्थापन केली जाणार आहेत, रांका यांनी यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले, रांका हे याबद्दल बोल–ताना ते म्हणाले की, मी नुकतेच पाहिले की मोदीजींनी जलदगती न्यायालये स्थापन करण्याबद्दल घोषणा केली आहे. जेणेकरून पेपरफुटीत सामील असलेल्या व्यक्तींना त्वरित शिक्षा देता येईल. यावर त्यांनी मोदींना प्रश्न केला की, कृपया मला सांगा की या देशात पेपरफुटी का होत आहेत?

## क्रीडा मंत्री डॉ. मांडविया यांनी राष्ट्रकुल क्रीडामंत्र्यांच्या बैठकीला केले संबोधित

नवी दिल्ली–केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे राष्ट्रकुल क्रीडामंर्त्याच्या बैठकीला संबोधित करताना राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमधील सहकार्यासाठी सदस्य राष्ट्रांच्या नेतृत्वाखालील अधिक मजबूत चौकटीचे आवाहन केले.

''एकत्र काम करण्याची पुनर्कल्पना: क्रीडा क्षेत्रातील राष्ट्रकुल सहकार्य बळकट करणे'' या विषयावर मुख्य भाषण करताना डॉ. मांडविया यांनी राष्ट्रकुलमधील क्रीडा प्रशासन, खेळाडूंचे कल्याण आणि संस्थात्मक क्षमता या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्याबाबतची भारताचा दृष्टिकोन मांडला.

राष्ट्रकुल खेळांप्रति भारताच्या दीर्घकालीन वचनबद्धतेवर प्रकाश टाकत मंत्री म्हणाले की देश अहमदाबाद येथे २०३० च्या शताब्दी राष्ट्रकुल खेळांचे आयोजन करण्याची तयारी करत आहे.

डॉ. मांडविया यांनी प्रशासकीय सुधारणा, बळकट केलेली उत्तेजक द्रव्यविरोधी यंत्रणा आणि खेलो इंडिया, फिट इंडिया व अस्मिता लीग यांसारख्या प्रमुख उपक्रमांची रूपरेषाही मांडली. हे उपक्रम तळागाळातील प्रतिभेला प्रोत्साहन देत आहेत, खेळांमध्ये महिलांचा सहभाग वाढवत आहेत



आणि देशभरात एक चैतन्यमय क्रीडा संस्कृती जोपासत आहेत, असे ते म्हणाले.मंर्त्याचे निर्णय कृतीत उतरवण्यासाठी एक वार्षिक व्यासपीठ म्हणून राष्ट्रकुल क्रीडा समन्वय मंच स्थापन करण्यास तसेच ज्ञानाची देवाणघेवाण आणि क्षमता बांधणीला प्रोत्साहन देण्यासाठी सदस्य राष्ट्रांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रकुल उत्कृष्टता केंद्रांचे जाळे उभारण्यास भारताचा भक्कम पाठिंबा असल्याचे त्यांनी सांगितले. ''२०३० पर्यतच्या कालावधीत बैठका, तांत्रिक कार्यशाळा आणि प्रादेशिक सल्लाम सलत आयोजित करण्यास भारत आनंदाने तयार आहे,'' असे ते म्हणाले.केंद्रीय मंर्त्यानी नमूद केले की प्रस्तावित सदस्य–नेतृत्वाखालील दृष्टिकोन हा क्रीडा प्रशासनातील भारताच्या स्वत:च्या सुधारणांचे प्रतिबिंब आहे.डॉ. मांडविया यांनी २०३० च्या शताब्दी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्याच्या भारताच्या सज्जतेचा पुनरुच्चार केला आणि सांगितले की या खेळांची एक ऐतिहासिक, शाश्वत आणि संस्मरणीय आवृत्ती आयोजित करण्यासाठी अहमदाबाद पूर्णपणे तयार आहे.

ते म्हणाले की अहमदाबादची जागतिक दर्जाची क्रीडा पायाभूत सुविधा आणि उत्कृष्टतेप्रती असलेली वचनबद्धता ही एक जागतिक क्रीडा महासत्ता म्हणून भारताची वाढती प्रतिष्ठा आणि प्रमुख आंतरराष्ट्रीय बहु–क्रीडा स्पर्धा यशस्वीपणे आयोजित करण्याची क्षमता प्रतिबिंबित करते. त्यांनी प्रस्तावित नेतृत्व प्रारूपालाही पाठिंबा दिला, ज्यानुसार आगामी यजमान राष्ट्र हे राष्ट्रकुल क्रीडामंर्त्याच्या बैठकीचे अध्यक्षपद सांभाळेल तर सह –अध्यक्षपदाची जबाबदारी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धे च्या अध्यक्षांकडे असेल.आपल्या भाषणाचा समारोप करताना डॉ. मांडविया यांनी राष्ट्रकुल राष्ट्रांना भागीदारी अधिक दृढ करण्याचे तसेच सामाजिक विकासासाठी खेळाच्या सामर्थ्याचा उपयोग करणाऱ्या चिरस्थायी संस्था उभारण्याचे आवाहन केले.''आपण चिरस्थायी संस्था उभारूया, फलदायी सहकार्य अधिक दृढ करूया आणि भावी पिढ्यांसाठी खेळाच्या परिवर्तनकारी शक्तीचा उपयोग करून घेऊया. मानवाधिकारांचा आदर करणाऱ्या आणि सर्वांसाठी संधी निर्माण करणाऱ्या सुरक्षित, सर्वसमावेशक आणि न्याय्य क्रीडा प्रणालींप्रति भारत आपली वचनबद्धता पुन्हा एकदा व्यक्त करत आहे,'' असेही ते म्हणाले.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीअंतर्गत बाल रुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच आर्थिक सहाय्य

## त्रिपक्षीय करारातून राज्यातील २०० बालरुग्णांना मिळणार लाभ

**मुंबई/प्रतिनिधी:** मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी अंतर्गत बालरुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच स्वतंत्र आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. महागड्या निदान चाचण्यांमुळे उपचार प्रक्रियेत होणारा विलंब टाळून कर्करोगाचे वेळेत निदान व्हावे, यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात त्रिपक्षीय करार करण्यात आला आहे. या विशेष उपक्रमांतर्गत राज्यातील २०० आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्करोगग्रस्त बालरुग्णांना निदानासाठी आवश्यक असलेल्या वैद्यकीय चाचण्यांसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.

या लाभाअंतर्गत ० ते १८ वयोगटातील पात्र बालरुग्णांना कर्करोगाचे निदान निश्चित करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्राथमिक तसेच पुढील खर्चिक वैद्यकीय चाचण्यांसाठी आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. या सहाय्यामुळे आर्थिक अडचणींमुळे निदान प्रक्रियेत होणारा विलंब टाळून वेळेत निदान आणि उपचाराचे प्रभावी नियोजन करणे शक्य होणार आहे.

पहिल्या दोन महिन्यांतच ५९ बालरुग्णांना ५० लाख रूपयांचे आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात आले आहे. या सर्व बालरुग्णांचे कर्करोग निदान टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथे करण्यात आले. बालरुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच सुरू करण्यात आलेला हा उपक्रम आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी महत्त्वाचा आधार ठरत आहे. वेळेत निदान झाल्यामुळे उपचाराला होणारा विलंब कमी होऊन बालरुग्णांना योग्य वेळी उपचार सुरू करण्यास मदत होत आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी अंतर्गत बालरुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच स्वतंत्र आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. हा लाभ राज्यातील २०० आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्करोगग्रस्त बालरुग्णांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या २०० लाभार्थ्यांपैकी आतापर्यंत ५९ बालरुग्णांना निदानासाठी आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे. गरजू रूग्णांनी अधिक माहितीसाठी टोल फ्री क्रमांक १८००१२३२२११ वर संपर्क साधावा असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रवीण औताडे यांचे स्वागत



**लातूर/प्रतिनिधी:** धाराशिवचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रवीण औताडे यांची लातूर येथे त्याच पदावर बदली झाली आहे. नुकताच त्यांनी पदभार स्वीकारला असता राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

यावेळी अधीक्षक व्ही. आर. काळे, ज्ञानेश्वर गोसावी, विजयकुमार धनशेट्टी, वासंती काळे, पूजा भोसले, सतीश श्रीमंगले, गोविंद गुट्टे, प्रभाकर सूर्यवंशी, उमाकांत गायकवाड, शिवकांत वाडीकर, अनिल वाघमारे आदि उपस्थित होते.यावेळी औताडे व प्राचार्य केंद्रे यांनी जिल्ह्यातील शासकीय आणि खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), तांत्रिक शाळा आणि अल्प मुदतीचे प्रशिक्षण देणार्या संस्थांबाबत चर्चा झाली.

# विलास साखर कारखाना युनिट-२ तोंडार चे मिल रोलर पुजन चेअरमन वैशालीताई देशमुख यांच्या हस्ते संपन्न

**उदगीर/प्रतिनिधी:** तोडार ता. उदगीर येथील विलास सहकारी साखर कारखाना युनिट - २ तोडार येथील कारखान्यात गळीत हंगाम २०२६-२७ चे वेळेवर अणि पुर्ण क्षमतेने सुरु करण्यासाठी तांत्रीक कामे केली जात आहेत, याच तयारीचा एक भाग म्हणुन बुधवार दि. २२ जुलै रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता कारखान्याच्या मिल रोलरचे पुजन कारखान्याच्या चेअरमन आदरणीय वैशाली विलासराव देशमुख अणि संचालक मंडळाच्या उपस्थितीत मध्ये विधीवत मिल रोलर पुजन करण्यात आला.

या पुजनानंतर संचालकांच्या उपस्थीतीत गळीत हंगाम तयारी बाबत आढावा बैठकही संपन्न झाली. विलास कारखाना कार्यक्षेत्रात गळीत हंगाम २०२६-२७ मध्ये कार्यक्षेत्रातील ऊसाचे वेळेवर गाळप होण्यासाठी कारखान्याचे संस्थापक, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतीक कार्य मंत्री तथा पालक मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख, आणि चेअरमन श्रीमती



वैशाली विलासराव देशमुख यांनी गळीत हंगाम लवकर सुरु करण्याच्या दृष्ट्रीने तयारी करण्याच्या सुचना दिल्या आहेत.

या अनुष्गाने सर्व हंगामपुर्व यंत्रसामुग्री देखभाल व दुरुस्तीची काम प्रगतीपथावर असुन, मागील गळीत हंगामाप्रमाणेच येणारा हंगाम २०२६-२७ यशस्वी करण्यासाठी सक्षम नियोजन करण्यात येत आहे. आगामी गळीत हंगामासाठी कारखाना कार्यक्षेत्रात पुरेसा ऊस उपलब्ध आहे. कारखान्याकडे १५ हजार हेक्टर ऊसाची नोंद झालेली आहे. कारखान्याने ऊस तोडणीचे योग्य नियोजन केले असुन, या हंगामात जास्तीत जास्त ऊस हा तोडणी यंत्रणाद्वारे तोडणी करण्यात येणार आहे.

भविष्यात ऊसाची उपलब्धता पाहता १०० टक्के ऊस तोडणी यंत्रणाद्वारे केल्यानंतर ऊसाचे गाळप करण्यासाठी आवश्यक आसणारी मशिनरी बसविण्यात येत आहे. या हंगामात तांत्रिक कारणामुळे कारखाना बंद तास कमी राहतील याची दक्षता घेतली जाणार आहे. हंगाम बंद असताना सुरु असलेली मशिनरी देखभाल व दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर असुन, लवकरच कारखाना गळीत हंगामासाठी सज्ज असेल अशी कारखान्याचे कार्यकारी संचालक ए.आर. पवार यांनी माहिती दिली आहे.

लोकनेते विलासरावजी देशमुख यांची प्रेरणा, माजी मंत्री दिलीपरावजी देशमुख यांचे नियोजन तसेच कारखान्याचे संस्थापक, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतीक कार्य मंत्री तथा पालक मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख, लातुर जिल्हा मध्यवर्ती बॅकेचे चेअरमन धिरज विलासराव देशमुख आणि चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी वाटचाल करत आहे. विलास सहकारी साखर कारखान्याने मागील गळीत हंगामात ऊस उत्पादकांना प्रति मे. टन रु. ३१३१ इतका उच्चाकी दर दिला आहे. यामुळे कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये मोठे आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण आहे.

या विक्रमी दरामुळे शेतकऱ्यांच्या अर्थिक स्थितीत सुधारणा होण्यास मदत झाली असुन, कारखान्याची यशस्वी वाटचाल सुरु आहे. मील रोलर पुजन कार्यक्रमास माजी आमदार तथा व्हाईस चेअरमन वैजनाथराव शिंदे कार्यकारी संचालक ए.आर.पवार संचालक, अनंत बारबोले, नरसिंग बुलबुले, रसुल पटेल, सुभाष माने, तात्यासाहेब पालकर, रंजित पाटील, गार्वधन मोरे, दिपक बनसोडे, नेताजी साळुंखे, अमृत जाधव, सतिष शिंदे, लताबाई देशमुख, निमंत्रीत संचालक कल्याण पाटील, पंडीत ढगे, विनोबा पाटील, राजेंद्र पाटील, मारोती पांडे, उदगीर तालुका कॉग्रेस अध्यक्ष संतोष बिरादार व खातेप्रमुख विभागप्रमुख, कर्मचारी व कामगार यांची मोठया संख्यने उपस्थिती होती.

# किल्लारी येथे महाराजस्व समाधान शिबिरात स्मार्ट मीटरचा जागर

## महावितरणकडून वीज ग्राहकांच्या शंकांचे केले समाधान

**किल्लारी/प्रतिनिधी:** स्मार्ट मीटरबाबत नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी तसेच ग्राहकांच्या मनातील शंका दूर व्हाव्यात, या उद्देशाने महावितरणच्या किल्लारी उपविभागाच्या वतीने बुधवार (दि. २२ जुलै) रोजी किल्लारी येथे आयोजित महाराजस्व समाधान शिबिरात स्मार्ट मीटर जनजागृती अभियान राबविण्यात आले. यावेळी वीजग्राहकांशी थेट संवाद साधत स्मार्ट मीटरची कार्यपद्धती, त्याचे फायदे आणि बिलिंग प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

शिबिरामध्ये अनेक वीजग्राहकांनी स्मार्ट मीटरमुळे वीजबिल वाढते का, वीज वापराची माहिती कशी मिळते, मीटर रीडिंग किती अचूक असते, चुकीचे बिल आल्यास तक्रार कशी नोंदवावी, अशा विविध प्रश्नांची विचारणा केली. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी प्रत्येक प्रश्नाचे वस्तुनिष्ठ व समाधानकारक स्पष्टीकरण देत ग्राहकांच्या सर्व शंकांचे निरसन केले.

यावेळी स्मार्ट मीटरमुळे वीज वापरावर ग्राहकांचे अधिक प्रभावी नियंत्रण राहते, वीज वापराची माहिती वेळोवेळी उपलब्ध होते, बिलिंग प्रक्रियेत पारदर्शकता वाढते, मीटर रीडिंगमध्ये मानवी हस्तक्षेप टळतो आणि वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम व कार्यक्षम बनते, अशी माहिती देण्यात आली. तसेच स्मार्ट मीटरबाबत कोणत्याही अफवा किंवा अप्रमाणित माहितीवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीसाठी महावितरणशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

या जनजागृती उपक्रमास महावितरणच्या किल्लारी उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता संदीप भुरे, जनसंपर्क अधिकारी धनंजय पवार, कनिष्ठ अभियंता व्यंकटेश जोशी, उच्चस्तर लिपिक सूर्यकांत क्षीरसागर, हनुमान शिंदे, निम्नस्तर लिपिक अमीत नाचणे, तंत्रज्ञ खंडेराय सावंत तसेच उमेश साखरे उपस्थित होते. उपस्थित अधिकाऱ्यांनी ग्राहकांशी प्रत्यक्ष संवाद साधून स्मार्ट मीटरविषयीच्या शंकांचे निरसन केले.

महाराजस्व समाधान शिबिरात महावितरणच्या या उपक्रमाला वीजग्राहकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.




भविष्यातही अशाच प्रकारे जनजागृती व ग्राहक संवाद कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे महावितरणकडून सांगण्यात आले.

# निलंग्यात नगरपालिकेच्या सभापतींना नागरिकांनी घातला घेराव!

## चिखलमय रस्त्यांमुळे संतप्त नागरिकांचे थेट गुडघाभर चिखलात बसून आंदोलन

**निलंगा/अयुब बागवान:** लातूर जिल्ह्यातील निलंगा शहरात रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे नागरिकांचा उद्रेक पाहायला मिळत आहे. शहरातील सर्वच रस्ते पावसामुळे चिखलमय झाले असून, विद्यार्थ्यांना शाळेत जाणेही कठीण झाले आहे. या त्रासाला कंटाळून निलंगा शहरातील भिल्ल वस्तीमधील नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांनी थेट गुडघाभर चिखलात बसून अनोखे आंदोलन केले.

दरम्यान, परिसराची पाहणी करण्यासाठी आलेल्या निलंगा नगरपालिकेच्या महिला-बालकल्याण व स्वच्छता सभापती सुधा वाघमारे यांचा रस्ता नागरिकांनी अडवून धरला. आधी आमचा रस्ता तयार करून द्या, मगच पुढे जाऊ देऊ! असा आक्रमक पवित्रा घेत संतप्त महिलांनी सभापतींना थेट घेराव घातला. या आंदोलनामुळे पालिका प्रशासनाची चांगलीच डोकेदुखी वाढली आहे.

निलंग्यात चिखलमय रस्त्यांमुळे नागरिकांचा तीव्र आक्रोश! सभापती सुधा वाघमारे यांना महिलांचा घेराव.

चिमुकल्या विद्यार्थ्यांचे गुडघाभर चिखलात बसून आंदोलन. रस्त्यांमुळे वाहने रुतली; त्वरित सिमेंट रस्त्यांची मागणी.



शहरातील बहुतांश रस्त्यांवर चिखलाचे साम्राज्य पसरल्याने चारचाकी आणि दोनचाकी वाहने चिखलात रुतून बसत आहेत. यामुळे रोजचा प्रवास नरकयातनांसारखा झाला असून अपघाताचा धोकाही प्रचंड वाढला आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे रस्त्यावर पसरलेल्या या चिखलामुळे लहान मुलांना शाळेत जाणे अशक्य झाले असून, विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत आहेत.

त्यामुळे पालिका प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ कायमस्वरूपी सिमेंट रस्ते तयार करावेत, अशी जोरदार मागणी आता निलंगावासीयांतून केली जात आहे.

# सरस्वती महाविद्यालयात माजी उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांना विनम्र अभिवादन



**लातूर/प्रतिनिधी:** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक २२ जुलै २०२६ रोजी स्व.अजितदादा पवार यांची जयंतीउत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य. डॉ. पांडुरंग भिवाजी गोरे आणि उपस्थितांनी स्व.अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन आणि पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन केले.

या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना प्रा.श्रीमंत दोरवे यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे जीवन आणि कार्य या विषयावर उपस्थितांना सखोल असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. पांडुरंग गोरे हे होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.रवि चव्हाण यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ.वसंत बंडे यांनी मानले.याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. बालाजी शिंदे, डॉ. वसंत बंडे, प्रा.रवि चव्हाण, प्रा.सलील शहाजिंदे, प्रा. अमोल जाधव, डॉ.सुदाम पवार, डॉ. मोनालीसा खानोरकर, प्रा.ज्योती मामडगे, डॉ.संतोष कुलकर्णी, प्रा. श्रीमंत दोरवे, प्रा.तुकाराम येमले, श्री. विठ्ठल चव्हाण , श्री. बळीराम कदम,श्री.कोंडीराम कागले, भागीरथी लाड महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेणा कारखान्याचे वतीन उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना आदराजंली

**रेणापूर/प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा सहकार क्षेत्रातील नेतृत्व स्व. अजितदादा अनंतराव पवार यांच्या जयंतीनिमित्त रेणा सहकारी साखर कारखान्याचे वतीने स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्हार घालुन आदराजंली अर्पण करण्यात आली.

या आदराजंली कार्यक्रमास कारखान्याचे चेअरमन मा. श्री. अनंतराव ठाकुर (देशमुख), व्हा.चेअरमन मा. ॲड. श्री. प्रवीण पाटील, कार्यकारी संचालक श्री. बी.व्ही.मोरे, डिस्टलरी इन्चार्ज दत्तात्रय देशमुख, चिफ अकौंट महेश निंबाळकर, चिफ इंजिनिअर प्रफुल्ल चव्हाण, मुख्य शेतकी अधिकारी श्री. प्रशांत शेळके, कार्यालयीन अधीक्षक श्री. प्रशांत साळुंके, पर्यावरण अधिकारी विशाल वडवले, डे. चिफ अकौंट श्री. आयुब शेख, सि. केमीस्ट तोडकर, परचेस अधिकारी श्रीकांत सावंत, आय.टी. मॅनेजर श्री. संभाजी पवार, स्टोअर किपर श्री. शरद पाटील, कामगार संघटना अध्यक्ष श्री. पुष्पक देशमुख यांच्यासह इतर अधिकारी



आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी कारखान्याचे कार्यकारी संचालक बी.व्ही. मोरे यांनी प्रस्तावीक केले, त्यांनंतर व्हा.चेअरमन मा.ॲड.श्री. प्रवीण पाटील तसेच चेअरमन मा.श्री. अनंतराव ठाकुर (देशमुख) यांनी आपले मनोगत व्यक्त करत स्व. अजितदादा पवार यांनी राज्याच्या विकासासाठी, सहकार चळवळीच्या बळकटीकरणासाठी, साखर उद्योगासाठी, तसेच शेतकऱ्यांच्या हितासाठी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाचा गौरवपर्ण उल्लेख करुन त्यांच्या कार्याला उजाळा देण्यात देण्यात आला.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# लोकमान्य टिळक यांचे स्मारक वर्षभरामध्ये उभारणार महापौर जयश्री सोनकांबळे

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरांमध्ये बहुतांश सर्व समाज सुधारकांची स्मारके उभारली गेली आहेत परंतु लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे स्मारक गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे या स्मारकाच्या उभारणीसाठी ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्या सर्व समस्यांची सोडवणूक माझ्या महापौर पदाच्या कार्यकाळामध्ये पूर्ण करून त्याची उभारणी आगामी वर्षभरामध्ये करण्याची हमी महापौर जयश्री सोनकांबळे यांनी दिली आहे.

लातूर शहरात लोकमान्य टिळक चौक येथे आज गुरुवार दिनांक २३ जुलै रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची १७० वी जयंती साजरी करण्यात आली यावेळी त्या कार्यक्रमाच्या अध्यक्षा स्थानावरून बोलत होत्या.

लातूर शहरात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची १७० वी जयंती साजरी करण्यात आली या कार्यक्रमा च्या अध्यक्षस्थानी महापौर जयश्री सोनकांबळे, तर लातूर शहर महानगरपालिकेचे



आयुक्त राहुल कुलकर्णी, लातूर शहर महानगरपालिकेतील काँग्रेसचे गटनेते, विजयकुमार साबदे, नगरसेवक प्रवीण कस्तुरे, प्रेरणा होनराव, ड. दीपक मठपती, यांची प्रमुख उपस्थिती होती.

त्या पुढे म्हणाल्या लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे ज्येष्ठ समाज सुधारक होते त्यांच्या विचाराची आणि कार्याची जपणूक प्रत्येक लातूरकराकडून झाली पाहिजे. त्यांचे विचार अंगीकारले गेले पाहिजेत. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे तो मी मिळविणारच यातून त्यांनी प्रेरणा दिली. तर गणेश उत्सवासारखा लोकसहभाग निर्माण होणारा उत्सव सुरू केला. धार्मिक उत्सव साजरा करण्याची परंपरा त्यांनी निर्माण केली त्यांची ही प्रेरणा लातूरकरांसाठी सदैव प्रेरणादायी ठरणार आहे त्यामुळे त्यांच्या विचाराची जपणूक होण्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून त्यांचे स्मारक प्रलंबित आहे त्याची पूर्तता मी माझ्या महापौर पदाच्या कार्यकाळामध्ये नक्कीच करेन यासाठी मी लातूर शहर महानगरपालिका प्रशासन आणि शासन यांच्याकडे नक्कीच पाठपुरावा करेन अशी हमी त्यांनी यावेळी दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक लोकमान्य टिळक विचार मंचचे अध्यक्ष संजय निलेगावकर, यांनी केले तर आभार लोकमान्य टिळक विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब देशपांडे यांनी मानले. सूत्रसंचालन श्रीनिवास फडणीस यांनी केले. या कार्यक्रमासाठी लोकमान्य टिळक विचार मंचचे सर्व पदाधिकारी, उत्तराधी मठाचे रघुत्तमाचार्य जोशी, प्रसाद उदगीरकर, मनोज जोशी, वामन पाठक, विष्णू आष्टीकर, वीरेंद्र पाटील, भानुदास भातांबरेकर, सचिन दिवाण, किरण कुलकर्णी, विवेक हाडगेकर, शुभम कुलकर्णी, ड. मातोळकर, महेंद्र जोशी, दगडुप्पा मिटकरी, भालचंद्र सोनकांबळे, वसंत भेंडे, डॉ. रवी पोरे, शिवकुमार क्षीरसागर, संजय सूर्यवंशी, अतुल कुलकर्णी, संजय समुद्रे, अमित सौंदल्ली, योगेश उन्हाळे, बाळू घाटगे, विनोद मोरे, यांच्यासह अनेक मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती



## मुख्याध्यापक गंगाधर खेडकर यांचा सेवानिवृत्तीबद्दल मराठा बचत गटातर्फे सत्कार

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर तालुक्यातील गंगापूर येथील स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक गंगाधर खेडकर हे ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर नुकतेच सेवानिवृत्त झाले असून त्यांचा मराठा बचत गटाच्यावतीने कुणबी मराठा सेनेचे संस्थापक अध्यक्ष विश्वनाथ कोळसुरे यांच्याहस्ते त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रा.शिवाजी साळुंके, दयानंद महाविद्यालयातील दीपकराव ढोले, गोविंद हालसे, उद्योजक साईनाथ लोमटे, दिलीप जाधव, संजय धुमाळ व पत्रकार बाळासाहेब जाधव आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा.शिवाजी साळुंके म्हणाले की, गंगाधर खेडकर सर यांनी स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालयाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य केलेले आहे. त्यांच्या हातून घडलेले अनेक विद्यार्थी शासकीय, निमशासकीय सेवेमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी ३२ वर्षांच्या सेवेमध्ये विद्यार्थ्यांना अध्यात्म, विज्ञान व व्यावसायिकतेवर आधारित दिशादर्शक मार्गदर्शन देण्याचे कार्य केलेले आहे. त्यामुळे यापुढील कालावधीत आपले आरोग्य सांभाळून त्यांनी आपले जीवन आनंदीपणे जगावे. असे आवाहनही त्यांनी यावेळी बोलताना केले.यावेळी या कार्यक्रमाला बचत गटातील सदस्य व इतर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेणापूर येथील समाधान शिबिरात विविध योजनेतील अनेकांना प्रत्यक्ष लाभाचे वितरण

## शासकीय योजनेतून एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये–आ. रमेशआप्पा कराड

**लातूर/प्रतिनिधी:** देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री विकासपुरुष देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वातील शासनाने अठरापगड जाती धर्मांना, गोरगरीब सर्वसामान्य माणसांला केंद्रबिंदू मानून अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या. या योजने पासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये त्यांना प्रत्यक्ष लाभ मिळावा यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या समाधान शिबिराचे आयोजन केले असून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जनतेच्या अडीअडचणी, तक्रारी, प्रश्नांची सोडवणूक करून विविध योजनेचा लाभ देऊन सर्वसामान्य जनतेचे समाधान करावे असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले. राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार साहेब यांच्या जयंती निमित्ताने शासनाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियाना अंतर्गत लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे रेणापूर येथे आयोजित समाधान शिबिराचे उद्घाटन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, भुमीअभिलेख जिल्हा अधीक्षक नसीम पटेल, रेणापूरचे तहसीलदार प्रशांत थोरात, लातूरचे सौदागर तांदळे, गटविकास अधिकारी शाम गोडभरले, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, रेणापूरच्या नगराध्यक्षा शोभाताई अकनगिरे,



जिपच्या महिला व बालकल्याण सभापती शिवकन्याताई गोडभरले, रेणापूर पंस सभापती मोनिका सूर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर, जिप सदस्य महादेव साळुंके, सौ. आशाताई भिसे, पद्माकर चिंचोलकर, मुख्यमंत्री बळीराजा शेत रस्ता समिती सहअध्यक्ष सुरज शिंदे, संगायो समितीचे रेणापूर तालुका अध्यक्ष सतीश आंबेकर, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, भागवत सोट, अभिषेक आकनगिरे, अनिल भिसे, बालाजी गोटके यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी व इतर अनेकांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. या समाधान शिबिर प्रसंगी विविध गावचे लोकप्रतिनिधी, लाभार्थी, महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. या समाधान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

लातूर ग्रामीण मतदार संघाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना शुभेच्छा देऊन स्वर्गीय अजितदादा पवार यांना आदरांजली अर्पण करून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदीजीच्या नेतृत्वात देशाने आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याने विकास कामात एक वेगळी उंची गाठली असून त्यांनी सुरू केलेल्या विविध जनकल्याणकारी योजना पात्र आणि गरजू लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ घेण्यासाठी समाधान शिबिराचा निश्चितपणे फायदा होईल.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी आत्तापर्यंतची सर्वात मोठी ऐतिहासिक कर्जमाफी जाहीर केली असून याचा ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. तर महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी क्रांतिकारी निर्णय घेऊन मुख्यमंत्री बळीराजा पाणंद शेत रस्ता योजना सुरू केली या योजनेतून लातूर ग्रामीण मतदार संघात येत्या दोन वर्षात एकही शेत रस्ता शिल्लक राहणार नाही प्रत्येक शेतकऱ्यांना मजबूत आणि पक्का रस्ता देण्याचे काम शासनाच्या वतीने हाती घेण्यात आले असल्याचे आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले. गावागावात शिव रस्त्याची कामे करताना कोणीही कोणाचीही आडवणूक करू नये असे सांगून आ. रमेशआप्पा कराड यांनी आडवणूक करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या शासनाच्या सूचना असल्याने एकही शेतरस्ता अतिक्रमित राहणार नाही सर्व रस्ते मोकळे होतील. कबाले नसल्यामुळे अनेकांना घरकुल योजनेचा लाभ मिळत नव्हता या पुढील काळात एकही पात्र लाभार्थी कबाल्यापासून वंचित राहणार नाही अशी माहिती देऊन आ. रमेशआप्पा कराड यांनी शासनाच्या योजनेपासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही. पात्र लाभार्थ्यांचे जोपर्यंत समाधान होणार नाही तोपर्यंत हे काम थांबणार नाही असेही त्यांनी बोलून दाखविले. प्रारंभी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे आणि संदीप कुलकर्णी यांनी एकाच छताखाली शासनाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या शेतकरी सन्मान निधी, मोफत वीज पुरवठा, सोलर पंप, लाडकी बहीण, मोफत राशन, घरकुल, विहिरी, लखपती दीदी योजना यासह सर्व योजनाचा पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची समाधान शिबिराच्या माध्यमातून सोय करण्यात आली असल्याची माहिती दिली. प्रारंभी तहसीलदार सौदागर तांदळे यांनी समाधान शिबिर आयोजनामागची भूमिका विषद करून या शिबिरात उभारण्यात आलेल्या विविध स्टॉलवर आपल्या अडीअडचणी मांडून त्या सोडवून घ्याव्यात असे बोलून दाखविले.

रेणापूर येथील समाधान शिबिरात महिला शेतकरी प्रमाणपत्र, रहिवासी आणि उत्पन्न प्रमाणपत्र, जिवंत सातबारा, डिजिटल सातबारा, प्रलंबित फेरफार, आयुष्यमान भारत कार्ड, गाव नकाशे, ट्रॅक्टर वाटप, सांगायो पात्र लाभार्थ्यांना मंजुरीपत्र, डिजिटल शिधापत्रिका, लेक लाडकी योजनेचा हप्ता, लखपती दीदी योजनेचे पत्र, बचत गटांना कर्जमुक्ती प्रमाणपत्र, बेबी केअर किट यासह विविध योजनेतील पात्र लाभार्थ्यांना आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते मंजुरी पत्राचे व प्रत्यक्ष लाभाचे वाटप करण्यात आले. शेवटी तहसीलदार प्रशांत थोरात यांनी आभार मानले. या कार्यक्रमास भाजपाचे महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, राजकिरण साठे, भैरवनाथ पिसाळ, बाबा भिसे, सुकेश भंडारे, अशोक राठोड, दत्ता सरवदे, विजय चव्हाण, दिपक वांगस्कर, रुपेश काळे, अच्युत कातळे, वसंत करमुडे, राजकुमार आलापुरे, सुरेश बुड्डे, श्रीमंत नागरगोजे, महेश गाडे, उत्तम चव्हाण, महादेव घुले नायब तहसीलदार तानाजी यादव, अशोक सोनकांबळे, प्रतीक्षा लांडगे, गणेश सरवदे यांच्यासह रेणापूर, लातूर तालुक्यातील विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी अनेक गावातील नागरिक, महिला पुरुष मोठ्या संख्येने होते. कार्यक्रम स्थळी आगमन होताच आ. कराड यांचे शाळकरी विद्यार्थ्यांनी लेझीम आणि विविध वाजंत्रीच्या गजरात जोरदार स्वागत केले.


www.latursamachar.com

वर रोज वाचा

ऑनलाईन....



**मध्य रेल्वे**

**सोलापूर विभाग**

**कर्षण मालमत्ता देखभाल**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी रेल्वेच्या ई-प्रोक्युरमेंट संकेतस्थळ www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवीत आहेत: **निविदा क्रमांक:** SUR/TD/T/2026/08R. **कामाचे नाव:** सोलापूर विभागामध्ये ऑक्सिलरी ट्रान्सफॉर्मर्स (AT), CLS पॅनेल, AT केबल, ट्रॅक्शन बाँड, अर्थ पिट, नंबर प्लेट इत्यादी मालमत्तेची दुरुस्ती/बदल आणि रंगकाम करून पुनर्स्थापना करणे. (पुनर्-निमंत्रण). **अंदाजित खर्च:** १,१८,२१,७२९/-. **बोली सुरक्षा:** २,३६,४००/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने. **प्रस्तावाची वैधता:** ६० दिवस. **संकेतस्थळावर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ:** १७.०८.२०२६ रोजी १५:०० वाजता.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD), सोलापूर**

EXP-34

तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा



**मध्य रेल्वे**

**सोलापूर विभाग**

**आरयूबी चे बांधकाम**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (बांधकाम) मध्य रेल्वे सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने प्रतिष्ठित कंपन्या/ कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी ई-निविदा मागवीत आहेत: **(१) निविदा सूचना क्र.:** 17-2026-SrDENS. **कामाचे नाव:** ADEN/KWV/BG अंतर्गत DD-KWV विभागातील BRB-MLM स्थानकांदरम्यान रेल्वे किमी २७८/५-६ येथे 'पुशिंग पद्धती'द्वारे आरयूबी (RUB - बॉक्सचा आकार 6.0m x 5.50m) चे बांधकाम. **कामाचा अंदाजित खर्च:** ६,४०,२६,४३३.५४ रुपये; **अनामत रक्कम:** १२,८०,५००.०० रुपये. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने. **देखभाल कालावधी:** ४८ महिने. **(२) निविदा सूचना क्र.:** 18-2026-SrDENS. **कामाचे नाव:** मोहोळ-वाडी विभागातील किमी ४३१/९-४३२/०, किमी ४५०/४-५, OHE मास्ट ४६५/१२-१४ आणि OHE मास्ट ५९२/१६-१८ येथे अतिरिक्त जलप्रवाहासाठी अतिरिक्त पूल उभारण्याकरिता स्थलाकृतिक सर्वेक्षण तसेच जलशास्त्रीय आणि हायड्रोलिक अभ्यास करणे. **कामाचा अंदाजित खर्च:** ३४,२२,०००.०० रुपये; **अनामत रक्कम:** ६८,४००.०० रुपये. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** ०३ महिने. **देखभाल कालावधी:** लागू नाही www.ireps.gov.in या **संकेतस्थळावर निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** ०७.०८.२०२६ रोजी सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत. इच्छुक निविदाकारांना सल्ला दिला जातो की, निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या निविदेबाबत जारी केलेले कोणतेही बदल किंवा शुद्धिपत्रके पाहण्यासाठी त्यांनी संकेतस्थळाला वारंवार भेट द्यावी. संकेतस्थळ: www.ireps.gov.in

EXP-33    डीआरएम (बांधकाम), सोलापूर

तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा



## टी.सी. व मार्कमेमो हरवला आहे.

**अक्षता रामेश्वर केदार या नावाची शासकिय महिला तंत्रनिकेतन लातूर ची सिव्हील इंजिनिअर डिप्लोमा पासची टीसी व भगवान विद्यालय किनगाव १० वी पासचा मार्कमेमो कोष्टगांव ते रेणापूर प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास कळवावे योग्य बक्षिस दिले जाईल.**

**संपर्क–९३२५७ २२६०६**


## पंढरीनाथ ..

तुझ्यामाझ्याअंतरात
कुठे नाही पंढरीनाथ
जिथे तिथे तोच दिसे
सर्व व्याप्त जगन्नाथ
जागोजागी दिसे हरि
जागाअसे काळजात
धाव घेतो तोच आधी
जेंव्हाभक्त काळजीत
कणोकणी तोचं वसे
सोबतीस्त अव्याहत
स्मतृगामी तोअंतरात
नाम स्मरण प्रत्याहत
संगेचालतो वारीमध्ये
अडखळता देतो हात
तोच पूर्ण करतो वारी
दे पुण्य भक्त पदरात
करी स्वागत पंढरीत
तळमळी तो इष्टागत
हरिस्वरुप होतो भक्त
आप्त सारे अभ्यागत
विठूराया फक्त माझा
कलागत मी विवादात
निर्भेळ निरामय सारे
मीठ मिसळे आनंदात
दर्शनेसर्वस्व लाभलेले
आता काही ना मागत
लेकराले न अंतर दिले
माझी माऊलीसमागत
श्रीहरिवारकरीअनुगत
कुणीही नाही निनंगत
कर्ता करविता छलिया
लिला न जाणे अबर्गत

**हेमंत मुसरीफ पुणे**
९७३०३०६९९६


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

The Executive Engineer (EHV O&M Division) on behalf of MSETCL (the Employer) invites online bids (SRM E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on Mahatransco E-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| Sr. No. | Particular of Works | SRM E-Tender No. | SRM E-Tender RFx No. |
|---|---|---|---|
| 01 | Work of Annual Maintenance Contract for various make Air Compressor for 132/220kV CBs at various EHV Substations under EHV O&M On, Latur. | EE/EHV/O&M/ LTR/TS/ 2026-27/T-04 | 7000040875 |

For further details, visit our Website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The ADEE (O) Phone No. +918956304921.
The DYEE (O) Phone No. +918554995271.

The undersigned reserves the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.

**Sd/-**
**Executive Engineer,**
**EHV (O&M) Division Latur**



MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**Notice Inviting Tender**

The Executive Engineer, MSEDCL, O & M Division Ambajogai, on the behalf of MSEDCL invites bids from eligible bidder through E-tendering tender for the following work. The interested bidders are request to login to MSEDCL web site www.mahadiscom.in/etender/etender.

| Sr. | Tender No. | Name of Work | Amount (In Lakhs) | Date |
|---|---|---|---|---|
| 1 | EE/AMB/TS/ E-T-10/ 2025-26 | E-Tender for the work of of Annual contract for transportation/ loading unloading of various line material,failed&repaired distribution Transformers, from filter unit Ambajogai to Kaij subdivision & Kaij subdivision to different work sites (Point of supply ), various major store and vice versa | 20 | Last date of submission is 31.07.2026 |
| 2 | EE/AMB/TS/ E-T-11/ 2025-26 | E-Tender for the work of of Annual contract for transportation/ loading unloading of various line material,failed&repaired distribution Transformers, from filter unit Ambajogai to Telgaon subdivision & Telgaon subdivision to different work sites((Point of supply ), various major store and vice versa | 20 | Last date of submission is 31.07.2026 |
| 3 | EE/AMB/TS/ E-T-12/ 2025-26 | E-Tender for the work of of Annual contract for transportation/ loading unloading of various line material,failed&repaired distribution Transformers, from filter unit Ambajogai to Dharur subdivision & Dharur subdivision to different work sites(Point of supply ), various major store and vice versa | 20 | Last date of submission is 31.07.2026 |

MSEDCL reserves the right to acept any tender or to reject of all tenders without asinging any reason theroff.

Contact person: Shri S.R.CHATE Add Executive Engineer, Mobile-7875762008 E-mail:- eeambejogai@ho.mahadiscom.in Executive Engineer,MSEDCL, O & M Division, Ambejogai.

**PRO No.-2924 dt 23.07.2026**    **Executive Engineer, MSEDCL, D.O., Ambejogai**



## जाहीर प्रगटन

मीजे निलंगा ता. निलंगा जि. लातूर व त्या परिसरातील तथा तालुका निलंगा, तालुका औसा, तालुका लातूर व जिल्हा लातूर येथील तमाम जनतेस व लोकाना या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, माझे अशील नामें मकबूल चाँदसाब शेख वय ५५ वर्षे धंदा शेती रा. भागीरथी नगर निलंगा ता. निलंगा जि. लातूर यानी दिलेल्या माहितीवरुन, दाखवलेल्या कागदपत्रावरुन व प्रदान केलेल्या अधिकारावरुन हे जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात येते की, माझ्या अशीलाने मौजे निलंगा ता. निलंगा जि. लातूर येथील जमीन सर्वे नंबर ५८/ड मधील आशा गुरुराज ज्ञानेश्वर हिप्पळे पाटील रा. निलंगा ता. निलंगा जि. लातूर यांच्या नावावरील क्षेत्र ०० हेक्टर २० आर

ज्याची चतुः सिमा
पूर्वेस– ज्ञानेश्वर हिप्पळे पाटील याची जमीन,
पश्चिमेस– नाला,
दक्षिणेस– पदमाकर खोमणे याची जमीन,
उत्तरेस– निलंगा औराद रोड

येणेप्रमाणे वरील चतुःसिमेच्या आतील शेत जमीन माझे पक्षकार यानी गुरुराज ज्ञानेश्वर हिप्पळे पाटील रा. निलंगा जि. लातूर याच्याकडून विकत घेण्याचा ठराव केला आहे व सदर जमीनीच्या ठरावापोटी काही रक्कम माझ्या पक्षकाराने वरील शेत जमीन मालकास इसारत दिलेली आहे. तेव्हा कोणीही व्यक्तीचा या मिळकतीत किंवा मिळकतीच्या एखाद्या भागात विरुध्द कब्जाने किंवा त्या जमीनीत त्या भागात वारसा, गहाण, बक्षीस, विक्री, देणगी, लिज, चार्ज, ट्रस्ट, लायसन्स, पोटगी इझिमेंट किवा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क असल्यास त्यानी खाली सही करणार तयांच्याकडे ही नोटीस जाहिर झाल्यापासून आठ (०८) दिवसाच्या आत कागदपत्रसह आम्हास अगर आमचे अशीलास भेटून माहिती द्यावी अथवा लेखी उजर कळवाचे तसे न केल्यास अशा प्रकारचा हक्क विचारात न घेता व जर एखादा हक्क असल्यास तो रद्द बातल झाला आहे किंवा असल्यास जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे पक्षकार वरील लिहीलेल्या मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व नंतर कोणतीही व कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही व ती आमचे अशीलावर बंधनकारक राहणार नाही. येणेप्रमाणे जाहिर प्रगटन/नोटीस दिली याची नोंद घ्यावी. सबब हे सर्वाच्या माहितीस्तव जाहिर प्रगटन.

दिनांक २३.०७.२०२६

नोटीस देणार
मकबुल चॉदसाब शेख
रा. भागीरथी नगर निलंगा
ता. निलंगा जि. लातूर

तर्फे
ॲड.अजीत एस. माकणे
जिल्हा सत्र न्यायालय,निलंगा



छोटी जाहिरात.. मोठा प्रतिसाद..



**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, निलंगा यांच्या न्यायालयात**

## जाहिर प्रगटन

**जन्म–मृत्यू नोंदणी बाबत**
**शाहीद विरूध्द ग्रामसेवक,**

ज्याअर्थी नामे शाहीद रजाक बागवान रा. नणंद ता. निलंगा जि. लातूर यांचा जन्म दिनांक १०/०९/२०११ रोजी मौजे. नणंद ता. निलंगा येथे झाला आहे. त्याअर्थी अर्जदार रजाक बक्षुसाब बागवान रा. नणंद ता. निलंगा जि. लातूर यांनी या न्यायालयात त्यांच्या जन्म नोंद करण्यासाठी आदेशीत करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पुष्ठ्यार्थ त्यांनी शपथपत्र व ग्राम पंचायत कार्यालय, नणंद ता. निलंगा जि. लातूर येथे त्यांच्या जन्म बाबतची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.

त्याअर्थी सदरहू नामे शाहीद रजाक बागवान रा. नणंद ता. निलंगा यांचा जन्म दिनांक १०/०९/२०११ रोजी झाला नाही, असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहिरनाम्याच्या तारखेपासून (३०) तिस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू नामे शाहीद रजाक बागवान रा. नणंद ता. निलंगा यांचा जन्म तारखेबाबत लागलीच पुरावा घेवून अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत आदेश देण्यात येईल.

पुढील तारीख – १७/०८/२०२६

स्वाक्षरीत/–
तहसिलदार तथा तालुका
कार्यकारी दंडाधिकारी,निलंगा



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade    Mo. 9422472502,    RNI 47034/64,    POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे.    मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२    आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६